
अर्पण

बाल लैंगिक शोषणापासून मुक्तिकडे

बाल यौन शोषण का मतलब क्या होता है ?

पीडोफाइल्स किसे कहते हैं

ऐसा नहीं लगता कि बच्चों के "उत्तेजक" पहनावे ऐसी घटनाओ का सबब बनते है ?



# बाल लैंगिक शोषण समजून घेताना: वारंवार विचारले जाणारे प्रश्न

अर्पण
बाल लैंगिक शोषणापासून मुक्तिकडे

# बाल लैंगिक शोषण समजून घेताना: वारंवार विचारले जाणारे प्रश्न

**प्रथम प्रकाशन, २०१४**
**व्दितीय आवृत्ती, २०१६**

ह्या साहित्याचे सर्वाधिकार (कॉपीराईट) अर्पणकडे आहेत. ह्याचा कोणत्याही स्वरुपात, वैयक्तिक आणि सार्वजनिक वापर करताना, ज्या आशयाचा वापर केलेला आहे त्या सहित खालील वाक्याचा स्पष्टपणे उल्लेख करून अर्पणला त्याचे श्रेय देणे गरजेचे आहे:

“हे साहित्य मूलत: अर्पणद्वारे निर्मित आणि सर्वाधिकाराधीन (कॉपीराईट) आहे, अर्पण ही मुंबईस्थित पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट असून ती महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम १९५०, नोंदणी क्र. E२४८७३ अंतर्गत नोंदणीकृत आहे.”

चित्रांकने:
कु. वृशाली थाले आणि श्री. आनंद वेंगुर्लेकर

वेष्टन संरचना आणि स्वरूप:
सिक्सोफस डिझाइन

विकसक आणि प्रकाशक : अर्पण

बाल लैंगिक शोषणापासून मुक्तिकडे

**पत्ता:** अर्पण हाऊस, डेल्टा केमिकल्स प्रा. लि., जे-१, कामा इंडस्ट्रियल इस्टेट,
ऑफ वाल भट्ट मार्ग, गोरेगाव (पू.), मुंबई- ४०० ०६३.
**फोन:** २६८६२४४४ / २६८६८४४४; मोबाईल: ९८१९० ५१४४४
**समुपदेशनासाठी:** ९८१९० ८६४४४
**ईमेल:** info@arpan.org.in; **वेबसाईट:** www.arpan.org.in
**ऑनलाईन कोर्सेसः** www.arpanelearn.com

# अनुक्रमणिका


## 1 प्रस्तावना
i बाल लैंगिक शोषण म्हणजे काय?............... 1

## 2 प्रभाव आणि घटना
i बाल लैंगिक शोषणाबाबत भारतात काय अविर्भाव आहे? ........................................ 3
ii बाल लैंगिक शोषण हे विकसित देशांत जास्तप्रमाणांत आढळते का? तिथे ते कशा प्रकारे हाताळले जाते? ................................ 4
iii पाश्चिमात्य देशांमध्ये संवाद हा अधिक खुला असतो आणि लोकांना बाल लैंगिक शोषणाबाबत अस्तित्वात असलेल्या कडक कायद्यांची अधिक जाणीव असली, तरीदेखील तिथे ते सर्रास का चालते?.......................... 4
iv मुले संवेदनक्षम असतात का? ..................... 5

## 3 शोषणकर्ता
i लोक लहान मुलांचे लैंगिक शोषण का करतात? ................................................. 6
ii शोषणकर्ता कोणत्या प्रक्रिया अनुसरतो?........ 7
iii तुम्हाला असे वाटते का की मुले “प्रक्षोभक” पोशाख घालून शोषणास आमंत्रण देतात? ..... 8
iv मनोविकारी आणि अश्लिलरीत्या (पेडोफाइल्स आणि हेबोफाइल्स) विकृत कोण असतात? .... 8
v लहान मुलांसोबत लैंगिक कृती करणाऱ्या अज्ञान मुलांबाबत तुम्हाला काय म्हणायचे आहे?...................................................... 9
vi शोषणकर्त्याला समजावणे आणि सल्ला देणे शक्य आहे का? याची किती मदत होऊ शकते?................................................... 9

## 4 जाहीर प्रकटन
i मुले शोषणाबाबत तातडीने का सांगत नाही . 11
ii मुले शोषणाबाबत कधी सांगतात?............. 12

## 5 प्रभाव आणि उपचार
i सीएसए चा मुलांवर/प्रौढांवर काय प्रभाव आहे?.................................................... 13
ii तुम्हाला असे वाटते का की शोषण झालेले मूल परत त्याच्या /तिच्या नियमित आयुष्याकडे वळू शकते?........................................... 14
iii शोषणाच्या बळींना आपण प्रभावावर मात करण्यासाठी कशी मदत करू शकू?........... 15

## 6 वैधानिक हस्तपेक्ष
i बाल लैंगिक शोषणाच्या केसबद्दल पोलिसांकडे कळविणे अनिवार्य आहे का?..................... 16
ii शोषणाबाबत एकदा पोलिसांना कळविल्यानंतर ते कोणती कारवाई करतील?..................... 17
iii बाल लैंगिक शोषणाच्या केसबद्दल खटला चालवताना न्यायालयाने कोणते सुरक्षेचे उपाय योजणे आवश्यक आहे?............................ 17
iv सीडब्लूसी म्हणजे काय आणि लहान मुलाला सीडब्लूसीच्या समोर कधी आणले जाते? सीडब्लूसीची बाल लैंगिक शोषणाच्या केसेसमध्ये काय भूमिका असते?............... 17
v संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी किती कालावधी लागतो? ................................................ 18
vi सभोवताली असलेल्या समस्यांना आपण कसे संबोधन करू शकतो? प्रतिवादी दोषी आहे किंवा नाही याचा अर्थ काय आहे? ............. 18
vii खटल्यादरम्यान परिवाराने राहते घराचे स्थान बदलल्यास अथवा केस मागे घेण्याचे ठरविल्यास, ते शक्य आहे का? गुन्हेगाराला यामुळे अशा परिस्थितींमध्ये मोकळे सोडले जाईल का?............................................ 19
viii जर कायदेशीर न्याय उपलब्ध नसेल तर मुलाच्या सुरक्षेची परिवाराला खात्री कशी होईल?................................................ 20
ix POCSO अचूकरीत्या अमलात आणले जात आहे का? ............................................... 20

## 7 तंत्रज्ञान आणि सीएसए
i आपल्याला तंत्रज्ञानाविषयी जाणून घेण्याची का आवश्यकता असते आणि त्याला लैंगिक शोषणझालेल्या मुलांच्या बाबतीत कशा रीतीने वापरले जाऊ शकते?............................... 22
ii मुलांची ऑनलाईन वर तयारी कशी वेगळी असते?................................................. 24
iii ऑनलाईन घडणार्या समस्यांना आपण कसे ओळखू शकू?......................................... 24
iv तंत्रज्ञान वापरत असताना आपण आपल्या मुलांना सुरक्षित कसे ठेवू शकतो?............. 24

## 8 अपंगत्वासह जगत असलेली लहान मुले
i अपंगत्वासह जगत असलेल्या लहान मुलास बाल लैंगिक शोषणाचा काय धोका असतो? . 25

ii अपंगत्व असलेल्या मुलाला वैयक्तिक सुरक्षिततेचे शिक्षण देणे आवश्यक आहे का?26
iii मर्यादित स्वरूपात संवाद साधू शकणाऱ्या मुलाला व्यक्तिगत सुरक्षा शिक्षणाविषयी माहिती देण्याचा सर्वोत्तम मार्ग कोणता आहे?....................................................26

## 9 CSA भेट:जागरुकता निर्माण करणे आणि प्रतिबंधाच्या दिशेने काम करणे

i सभोवताली CSA च्या बाबतीत बोलण्यास अस्वस्थता आहे. अशावेळी तुम्ही जागृती आणण्याचा कसा विचार कराल?................27
ii वाढते आकडे असताना देखील, मुलांवरील लैंगिक शोषण प्रतिबंधाचा कार्यक्रम सीमित स्वरूपात का आहे?.................................28

## 10 वैयक्तिक सुरक्षा शिक्षणावरील माहिती

i वैयक्तिक सुरक्षा शिक्षण काय आहे? हे कोण देऊ शकते?...........................................29
ii वैयक्तिक सुरक्षा शिक्षणामध्ये वयानुसार उचित तपशील असणे महत्वाचे का आहे?............30
iii पालक काय करू शकतात?.......................31
iv खाजगी अवयवांची नावे शिकवणे महत्वाचे का आहे?..................................................32
v सीबीएसी/आयसीएसई अभ्यास क्रमातील शास्त्राचे पाठ खाजगी अवयवांबाबत विस्तृतपणे आणि व्यापकतेने सांगतात. मग आपण आपल्या मुलांना वैयक्तिक सुरक्षा शिक्षण (पीएसई) कार्यक्रमात सहभागी करण्याची काय आवश्यकता आहे? ..................................33
vi जेव्हा मुलांना वैयक्तिक सुरक्षेबाबत शिकवले जाते, ते सुरक्षित स्पर्शांचा देखील प्रतिकार करतील का?..........................................33
vii विविध स्तरांतील आकलनशक्तीची मुले वैयक्तिक सुरक्षा शिक्षणाच्या वर्गांमध्ये दिलेल्या माहितीचा कसा समावेश करून घेऊ शकतील?..............................................33
viii आपण विशेष गरजू मुलांना वैयक्तिक सुरक्षा कशी शिकवू शकतो?...............................34
ix मुले सहसा प्रौढव्यक्ती दरम्यान लैंगिक कृती बघतात किंवा त्यांच्या राहणीमानामुळे सुस्पष्ट लैंगिक वर्तणूक आणि संदेशाचा अनुभव घेत असतात. अशा स्थितीमध्ये त्यांच्याशी वैयक्तिक सुरक्षे बद्दल बोलणे कितपत व्यावहारिक आहे?...................................35
x मुले वास्तविक जीवनात उद्भवणाऱ्या कोणत्याही असुरक्षित परिस्थितीला तोंड देण्यासाठी त्यांनी वैयक्तिक सुरक्षा वर्गात शिकलेली माहिती आणि कौशल्याचा वापर करू शकतील काय? ......................................35

## 11 बाल लैंगिक शोषणाच्या केसेसमध्ये हस्तक्षेप करणे

i जर मला एखादे लहान मूल बाल लैंगिक शोषणाचा शिकार झालेले आढळले तर मी काय केले पाहिजे? .........................................37
ii त्यातलेच, जो परिवाराचा सदस्य नाही तो कसा आणि किती मध्यस्थी करू शकेल?............38
iii मी एखाद्या प्रौढाचे अनुचित वर्तन कसे हाताळावे? .............................................39

## 12 चिंतेचे मुद्दे आणि धास्ती

i लैंगिक शोषणासारख्या संवेदनशील संकल्पनांबाबत पालक कसे बोलू शकतील?.40
ii कधीकधी लहान मुले त्यांच्या खाजगी अवयवांना स्पर्श करताना दिसतात, हे सीएसएचे लक्षण असू शकते का की हे व्यक्तीच्या लैंगिकतेचे नैसर्गिक प्रतिकृती आहे?....................................................41
iii मुले इतर मुलांशी खेळत असताना त्यांची उत्सुकता आणि इतर मुलांचा शोध (एक्सप्लोरेशन) आपण कसे हाताळावे?.......42
iv मुले आपल्या पालकांना संभोग करताना चुकून पाहतात, अशा घटनेमध्ये आपण कोणता प्रतिसाद दिला पाहिजे ?..........................42
v जेव्हा मुले आपल्याला बाळांचा जन्म कसा होतो हे विचारतात तेव्हा आपण काय उत्तर दिले पाहिजे?.........................................43
vi पालकांपैकी एकजण कपडे बदलत असताना त्यांच्या खोलीत जाण्याची परवानगी मुलांना का नसते? मात्र अशा वेळेस दुसऱ्या पालकास जाण्याची परवानगी का असते? मुलांनी असे प्रश्न विचारल्यास पालकांनी कसे उत्तर दिले पाहिजे? ...............................................43
vii मुलांना ह्या समस्येचे गांभीर्य कळावे म्हणून

मी बातम्यांमधील किंवा क्राईम पेट्रोल, सावधान इंडीया अशा कार्यक्रमामधील गोष्टी सांगितल्या पाहिजेत का? ......................................44
viii जेव्हा मूल काही गोष्टी जसे की, त्यांचे निकाल, अथवा शाळेतील मिटिंग्ज पालकांपासून लपवते, तेव्हा, पहिली प्रतिक्रिया असते ओरडणे अथवा मुलाला फटका मारणे अथवा मार देणे. याऐवजी अशा स्थितींमध्ये काय करता येईल? ..................................................44
ix शिक्षक लहान मुलांना कोणत्याही लैंगिक हेतूशिवाय स्पर्श करतात पण तरीही काही वेळेला त्यांच्यावर बाल लैंगिक शोषणाचे आरोप लावले जातात. काही शिक्षक तरूण असतात आणि विद्यार्थी कधीकधी विरुद्ध लिंगाच्या शिक्षकांकडे आकर्षित होतात. हा दोष शिक्षकाचा नसून लहान मुलाचा आहे का?..................45
x तुमच्या मुलाशी वयात येण्या बाबत बोलण्यासाठीचे कोणते वय योग्य आहे?......45
xi मुलांना वयात येण्या बाबतच्या सगळ्यात मोठ्या कोणत्या चिंता असतात? ..............46
xii मुलांनी मुलींमधील वयात येण्या बाबत शिकले पाहिजे का? मुलींनी मुलांमधील वयात येण्या बाबत शिकले पाहिजे का? ........................46
xiii विरुद्ध लिंगाच्या पालकाने मुलाशी वयात येण्या बाबतच्या बोलणे योग्य होईल का?...47
xiv पालक आणि किशोर अवस्थेतील मुले ह्यांच्या नात्यातील महत्त्वाचे गुण कोणते?............47
xv माझ्यासोबत असलेल्या निरोगी नातेसंबंधामुळे माझ्या किशोरवयीन मुलाच्या आरोग्य आणि विकासाला कसा फायदा होईल?.................47
xvi पालक म्हणून मी किशोरवयातल्या मुलांशी निरोगी नाते कसे प्रस्थापित करावे ?.........47



# 1. प्रस्तावना

प्रश्न i

## बाल लैंगिक शोषण म्हणजे काय?

बाल लैंगिक शोषण  (CSA ) बाल शोषण का बाल लैंगिक शोषण (सीएसए) हा बाल शोषणाचा एक प्रकार आहे. व्यक्ती जेव्हा लहान मुलाला त्याच्या /तिच्या लैंगिक समाधानासाठी वापरते तेव्हा बाल लैंगिक शोषण घडते.

साधारणपणे सत्ता अथवा अधिकार हातात असलेली, किंवा संस्थेचे विश्वस्तपद हातात असलेली व्यक्ती अनेकदा बाल लैंगिक शोषण करते. हे शोषण नातेसंबंधात घडून येते, कारण त्या व्यक्तीला मुलाच्या साधारण असहाय्यतेचा आणि दुबळेपणाचा गैरफायदा घेणे सोपे होते.

सीएसए हे शारिरिक, दृश्य अथवा शाब्दिक स्वरुपाचे असू शकते. यात स्पर्श आणि / अथवा लहान मुलाचे खाजगी अवयवांना कुरवाळणे (योनी, स्तन, शिश्न, अंडकोष, नितंब, गुदद्वार), बालकाला एखाद्याचे खाजगी अवयवांना स्पर्श करण्यास आणि / अथवा कुरवाळण्यास जबरदस्ती

करणे; मौखिक, योनीमधून अथवा गुदद्वारातून संभोग करणे अथवा विकृत लैंगिक सुखाच्या हेतूने कोणताही स्पर्श करणे यांचा समावेश होतो. एखाद्याने आपली गुप्तांगे लहान मुलासमोर उघड करणे, मुलाशी बोलताना लैंगिक भाषा वापरणे, मुलाची लैंगिक छायाचित्रे घेणे आणि मुलाला अश्लील साहित्य दाखवणे ही स्पर्श न करता केलेल्या शोषणाची उदाहरणे आहेत.

बाल लैंगिक शोषण हे बालकाच्या शरीराचे अथवा विश्वासाचे उल्लंघन आहे आणि कायद्याच्या विरुद्ध वर्तन आहे.

2



# 2. प्रभाव आणि घटना

**प्रश्न i**

## बाल लैंगिक शोषणाबाबत भारतात कितपत प्रभाव आहे?

महिला आणि बाल विकास मंत्रालयाने बाल लैंगिक शोषणावर एक अभ्यास 2007 मध्ये प्रकाशित केलेल्या अभ्यासाचा मूलभूत पाया सर्व भारतभर आयोजित करण्यात आलेल्या मोठ्या प्रमाणातील सर्वेक्षण होता. हे सर्वेक्षण13 राज्यांमध्ये करण्यात आले आणि यात नमुना म्हणून १२,४४७ लहान मुले, २३२४ तरूण आणि २४४९ भागधारक या समूहांचा समावेश होता. याव्यतिरिक्त भारतामध्ये सीएसए संबंधित एकत्रितरित्या आकडेवारी उपलब्ध करण्यासाठी केंद्रिय डाटाबेस अथवा देखरेख प्रणाली नाही. राष्ट्रीय अभ्यासाने खालील अहवाल दिला:

अ. ५३.२२% लहान मुले एका अथवा अधिक स्वरुपाच्या लैंगिक शोषणाला सामोरे गेले आहेत.

ब. मुलांमधील आणि मुलींमधील बाल लैंगिक शोषणाची अत्युच्च टक्केवारी आंध्र प्रदेश, आसाम, बिहार आणि दिल्लीमध्ये आढळली.

क. २१.९०% बाल प्रतिसादकांनी गंभीर स्वरुपाच्या लैंगिक शोषणाबाबत आणि ५०.७६% बालकांनी इतर प्रकारच्या लैंगिक शोषणाबाबत अहवाल दिला.

ड. ५०% शोषणकर्ता हे बालकाला माहिती असलेले अथवा विश्वासू आणि जबाबदार व्यक्ती आहेत (परिवाराचे सदस्य, जवळचे नातेवाईक, मित्र अथवा शेजारी)

ई. मुले देखील मुलीं इतकीच धोक्यात आहेत.

फ. बाल प्रतिसादकांपैकी ५.६९% जणांनी लैंगिक मारहाण / हल्ला /बलात्कार झाल्याचा अहवाल दिला. (या अभ्यासात निश्चित केल्यानुसार: लैंगिक बलात्कार म्हणजे गुदद्वाराmध्ये अथवा योनीमध्ये संभोग अथवा मौखिक संभोग)

प्रश्न ii

## बाल लैंगिक शोषण हे विकसित देशांत अधिक सामान्यपणे आढळते का? तिथे ते कशा प्रकारे हाताळले जाते?

बाल लैंगिक शोषण (CSA) प्रत्येक ठिकाणी होते. खरेतर, संशोधनानुसार, विकसित देशांपेक्षा भारतात शोषणाच्या जास्त घटना होत असतील. विकसित देशांमध्ये, अधिक केसेस नोंदविल्या जातात कारण त्यांच्याकडील यंत्रणा जागरुकता वाढविण्यासाठी आणि बाल संरक्षण मुद्दे आणि केसेस हातातळण्यासाठी कार्यरत असतात. भारतात CSAचा मुद्दा हा क्वचितच चर्चिला जातो कारण संभोगाविषयी काहीही चर्चा करणे निषिद्ध आणि घृणास्पद मानले जाते. प्रौढ देखील लैंगिकतेबाबत अथवा खुली चर्चा करत नाहीत. परिणामत: लहान मुलांनी वैयक्तिक शंका त्यांच्या पालक- शिक्षकांकडे अथवा काळजी घेणार्यांकडे व्यक्त करणे हे कमीच संभाव्याकरक आहे आणि अशाप्रकारे त्यांना मदत मिळत नाही.

अनेक विकसित देशांमध्ये “बाल संरक्षण” ही संज्ञा अनेकदा लहान मुले आणि अज्ञान युवावर्गाला संरक्षण देण्यासाठी आणि त्यांना सेवा पुरविण्यासाठी असलेल्या एक सरकारी चलित सेवांच्या संचाचे वर्णन करण्यासाठी वापरली जाते. या सेवांमध्ये विशिष्टपणे शिक्षण, बालकाची जोपासना, दत्तक प्रक्रिया सेवा, जोखिमेत असलेल्या परिवारांना ते व्यवस्थित रहावेत म्हणून आधार देणे आणि आरोपित बाल शोषणाचा तपास या सेवांचा समावेश होतो. समुदाय आणि व्यावसायिक यांना बाल शोषणाच्या मुद्द्याबाबत कळविले जाते आणि अशा केसेस मध्ये उपचार घेणे आणि घटना रोखणे यासाठी प्रशिक्षण दिले जाते.

“अनिवार्य नोंद” म्हणजे जर एखादा अहवाल बनवला गेला नाही तर त्या व्यक्तीला कायदेशीररीत्या जबाबदार धरले जाते. एकदा बाल शोषणाची केस नोंदविली गेली की तपास केला जातो. देशानुसार, लहान मुले जी बाल शोषणाचे बळी ठरली आहेत त्यांना सल्ल्यासाठी अनेक पर्याय उपलब्ध असतात आणि त्यांच्या बरे होण्याच्या प्रवासात मदतीसाठी अनेक उपचारपद्धती उपलब्ध असतात.

प्रश्न iii

## पाश्चिमात्य देशांमध्ये संवाद हा अधिक खुला असतो आणि लोकांना बाल लैंगिक शोषणाबाबत अस्तित्वात असलेल्या कडक कायद्यांची अधिक जाणीव असते, तरीदेखील तिथे ते अधिक सर्रास का चालते?

पाश्चिमात्य देशांत आणि भारतात बाल लैंगिक शोषण अनेक समान कारणांमुळेच सर्रास चालते. यामुळेच दृश्य विविधता असल्या तरी सर्व देशांमध्ये बाल लैंगिक शोषणाचा संदर्भ एकसमान रहातो.; किचकट यंत्रणांमुळे गुन्हा सिद्ध होणे अवघड होते; बळी गेलेल्या मुलांनाच नेहमी घडल्या घटनेबद्दल दोष दिला जातो; परिवारांना देखील नोंद करण्यात लाज वाटते; गुन्हेगाराची साक्ष अनेकदा बळी गेलेल्या मुलाच्या शब्दांपेक्षा

महत्वाची मानली जाते; मुलगे समलैंगिकतेला जोडल्या गेलेल्या कलंकाला सामोरे जावे लागेल याची भिती बाळगतात (जर गुन्हेगार पुरुष असेल तर) आणि अर्थातच लैंगिकता हा अतिशय संवेदनशील विषय म्हणून जगात मानला जाणे चालूच असल्यामुळे, अशाप्रकारे बाल लैंगिक शोषणाच्या चर्चा रोखल्या जातात.

प्रश्न iv

## मुलगे संवेदनक्षम असतात का?

हो, अधिक नसले तरी मुलींइतकेच मुलगेदेखील लैंगिक शोषणाचे संभाव्य बळी असू शकतात. मुलांचे बाल लैंगिक शोषणाचे बळी होण्याच्या तुलनेत मुलींच्या बाल लैंगिक शोषणाचे बळी होण्याच्या प्रमाणात भारत आणि पाश्चिमात्य देशांमध्ये बराच फरक आहे. प्रकाशित संशोधनानुसार भारतामध्ये मुलांचे बाल लैंगिक शोषणाचे बळी होण्याचे प्रमाण मुलींच्या तुलनेत जवळपास सारखे आहे, कदाचित जास्तच आहे; तर पश्चिमेत मुलींचे बळी मुलांपेक्षा अधिक जातात.

मुलगे बाल लैंगिक शोषणाचे बळी होणे या बाबतीची मान्यता, नोंदणी आणि उपचार नगण्य असण्याची अनेक कारणे आहेत, ज्यामुळे असे दिसते की मुलगे बाल लैंगिक शोषणाचे बळी होतच नाहीत अथवा क्वचित होतात. मुलगे संभाव्य बळी असण्याची अनेक कारणे आहेत. मुलांसाठी आणि मुलींसाठी ही कारणे निरनिराळी आहेत:

अ. घराबाहेर जाण्यासाठी अथवा विविध प्रकारच्या लोकांशी संवाद साधण्यासाठी मुलांना मुलींपेक्षा अधिक स्वातंत्र्य दिले जाते;

ब. मुलांना मुलींसारखे लैंगिक हिंसाचाराच्या धोक्यांविषयी जागरुक केले जात नाही;

क. मुलांवर पुरुषत्वाच्या विविध आदर्शांप्रमाणे जगण्याचे ओझे लादले जाते;

ड. शोषणाच्या नव्हे तर खेळाच्या रुपात दिसणारी लैंगिक कृती नकोशी असली तरीही लवकर करण्याच्या सामाजिक दबावाची जाणीव मुलांना नेहमी दिली जाते. / मुलांना लैंगिक कृती नकोशी असली तरीही कमी वयातच सामाजिक दबावामुळे ते शोषणाला खेळाच्या रूपात बघतात

जरी मुलांचे शोषण होत असले तरी या लैंगिक शोषणाची नोंद मुलींपेक्षा कमीच होण्याची शक्यता असते याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत:

अ. गुन्हेगार पुरुष असल्यास समलैंगिक वर्तनाचा सामाजिक कलंक (अनेकदा मुलांचे लैंगिक गुन्हेगार हे पुरूषच असतात);

ब. पुरुष स्वावलंबी असण्याची अपेक्षा पूर्ण करण्याची इच्छा असणे;

क. स्वातंत्र्य आणि बाहेर जाण्याची मुक्ती हरविण्याचा मुद्दा (उदा. त्यांना स्त्रियांप्रमाणे संरक्षित केले जाणे नको असते); आणि

ड. मुलांना त्यांच्या भावना स्वत:पाशीच ठेवणे आणि “मजबूत” दिसणे शिकवले जाते.

सदैव नियमनाखाली असलेल्या आणि प्रौढांमधील (विशेषत: स्त्रियांमधील) लैंगिक वर्तनाचा उचितपणा आणि निरुपद्रवीपणा गृहित धरलेल्या कधीही बळी न जाणार्या ‘पुरुषत्वाच्या आदर्शाबाबतच्या’ वरील गृहितकांमुळे आणि विश्वासामुळे तरुण मुले लैंगिक शोषणाबद्दल व्यक्त होण्यासाठी असे वातावरण तयार होते जिथे मुलांना कमी स्वीकृती मिळते आणि आधाराची साधने मिळत नाहीत.

3



# शोषणकर्ता

प्रश्न i

## लोक लहान मुलांचे लैंगिक शोषण का करतात?

याची अनेक कारणे असल्यामुळे या प्रश्नाला साधे आणि सरळ उत्तर देणे अवघड आहे. काही शोषणकार्त्यांबरोबर शोषण झालेले असते ज्यामुळे त्यांच्या लैंगिक गरजा प्रभावित झालेल्या असतात. काहीजण लहानपणी बळी ठरलेले असतात म्हणून त्यांना परत नियंत्रण प्रस्थापित करायचे असते आणि त्यांच्या कमजोर आणि असहाय्य असल्याच्या भावनेवर सशक्त गुन्हेगार होऊन विजय मिळवायचा असतो. इतरांचे प्रत्यक्ष शोषण झालेले नसते तरीदेखील त्यांचा लैंगिक विकास काही कारणाने प्रभावित झालेला असतो (जसे घरगुती हिंसाचाराचे साक्षीदार झाल्यामुळे)म्हणून त्यांना विशिष्ट वयाच्या लहान मुलांसमवेत संभोग करायचा असतो. काहीजण व्यवस्थित वाढतात पण अतिशय ताणाच्या स्थितीत बचाव यंत्रणा म्हणून त्यांना सहज साध्य असणार्या लहान मुलांशी संभोग करायचा असतो.

काही थोडेच शोषणकरते मानसिकदृष्ट्या आजारी व्यक्ती असतात. पण त्यांच्या लैंगिक समस्या

या प्रेरणा नियंत्रण आणि तणावमुक्तीच्या निरोगी मार्गांची उपलब्धता नसल्यामुळे मिश्रित असतात. (आपल्यापैकी अनेकजण अशा विरुद्ध स्वभावाचे नसतात). हे शोषणकर्ते साधारणपणे प्रतिगमन स्वभावाचे असतात. प्रतिगमन ही एक मागे जाण्याची मानसिक हालचाल आहे जी तणावामुळे एखादी व्यक्ती करते. जेव्हा आपण त्रस्त असतो अथवा घाबरलेले असतो, आपले वागणे नेहमी तेव्हा लहान मुलांसारखे होते. उदाहरणार्थ, आई मुलाला कमी मार्क मिळाले म्हणून त्रस्त असल्यास त्याने अधिक अभ्यास करावा म्हणून मारते. हे वागणे तिच्या पालकांच्या वागण्याशी जुळते असते.

बाल लैंगिक शोषण हे केवळ लैंगिकतेविषयी नाही, तर सत्ता आणि नियंत्रणाबद्दलदेखील आहे. आणि म्हणून लैंगिकदृष्ट्या शोषक वर्तन हे नेहमी शिकून अनुसरण केलेले वागणे असते. आपला समाज अशा रीतीने बनलेला आहे की विशिष्ट प्रकारच्या लोकांना इतरांपेक्षा अधिक अधिकार आणि सत्ता बहाल केली जाते. या सामाजिक संरचनेत जे लोक ही सत्ता आणि अधिकार ग्रहण करतात ते लिंग, वर्ग, जात, क्षमता, मानसिक आरोग्य, लैंगिक आवड, वय आणि वांशिकता या अनेक घटकांमध्ये विभागलेले असतात. शोषणकर्त्यांना साधारणपणे त्यांच्यापाशी वरील घटकांवर आधारित असलेल्या सत्तेची जाणीव असते. उदाहरणार्थ, जेव्हा आपण म्हणतो, “ मुलगे असेच वागणार” तेव्हा आपण पुरुष असलेल्या मुलांना इतर लोकांच्या शरीरांशी तुलना करण्याचा अधिकार देत असतो आणि आपण त्यांना दया आणि आदर शिकण्याची आणि त्यांच्या कृतींची जबाबदारी घेण्याची संधी नाकारत असतो.

धोकादायक लैंगिक गरजा आणि अनुकंपनीय बचाव यंत्रणा असलेल्या प्रौढ व्यक्तींसाठी लहान मुलांसमवेत संभोग हा त्यांचा तणाव निवळवण्याचा एक मार्ग असतो. अनेकदा त्यांनी एकदा संभोग केला की त्यांचा ताण कमी होतो आणि ते मग परत असे कधीही न करण्याचे वचन देतात - पण मग त्यांच्या अपूर्ण गरजा परत वर येतात आणि त्यांना मुलांबरोबर संभोग करण्याची इच्छा परत होतच रहाते. अनेक लोकांना हे चुकीचे आहे माहित असूनही तणावामुळे त्यांच्याकडून चुकीचे वर्तन घडले जाते.

लैंगिक हिंसाचार हा नेहमी हेतू पूर्व असतो आणि मुद्दाम केला जातो आणि बळी जाणार्या व्यक्तीवर एक वर्चस्वाची भावना लादण्यासाठी शोषण केले जाते.  बाल लैंगिक शोषण हे मुलाच्या वागणुकीमुळे किंवा मुलगा/मुलगी कशापद्धतीने वावरतात यामुळे कधीही घडत नाही.

प्रश्न ii

## शोषणकर्ता वापरत असलेल्या प्रक्रिया कोणत्या आहेत?

ज्या लोकांना मुलांसमवेत संभोग करायची इच्छा अथवा गरज भासते, त्यांना मुलांना सहजसाध्य ठेवणे अथवा एखाद्या विशिष्ट मुलाशी संबंध निर्माण करणे आवश्यक असते. याला वाढीची प्रक्रिया असे म्हणतात, ही प्रक्रिया मुलाकडून आणि त्याच्या / तिच्या वातावरणाकडून शोषणाची तयारी करवून घेते. ही शिस्तशीर प्रक्रिया आहे. शोषणकर्ता मुलातील दुबळेपणा शोधतो. दुबळेपणा जसे ज्या मुलांना प्रेम केले जात नसल्याचे अथवा नकोसे असल्याचे अथवा अप्रिय असल्याचे वाटत राहते, कौटुंबिक समस्या असतात, दुर्लक्षित असतात अथवा आत्मसन्मान नसतो, अशा मुलांना गुन्हेगार शोधतात आणि लैंगिक शोषणाचाबळी बनवतात. संभाव्य गुन्हेगार मग त्यांचा विश्वास मिळविण्यासाठी त्यांना मैत्रीच्या खुणा म्हणून सकारात्मक संदेश पाठवून, लक्ष देऊन, भेटवस्तू देऊन अथवा चॉकलेट्स देऊन त्यांचा दुबळेपणा गोंजारतात. नंतर तयार झालेल्या बंधाच्या आधारे शोषणकर्ता मुलाला त्याच्या / तिच्या वातावरणापासून एकटे पाडण्याचे मार्ग शोधतात, जसे शोषणकर्त्याच्या घरी जाणे, एकट्याने सिनेमाला जाणे, अथवा इतर खाजगी जागेवर जाणे. जेव्हा शोषणकर्ता मुलाला लैंगिक हेतूने स्पर्श करू लागतो तेव्हा ते स्पर्शांच्या संवेदना मोडण्यास हा विश्वासाचा बंध आणि एकटे पाडणे / गुप्तता मदत करतात. शोषणकर्ता मुलाला त्याच्या गरजेनुसार सांगू शकेल की हा स्पर्श प्रेमाचा अथवा मायेचा आहे. मूल त्यामुळे शांतपणे जाळ्यात फसते (मूले सांगत का नाहीत याबाबतच्या कारणांचे वरील मुद्दे पहा). हे शोषणकर्त्याचे मुलावरील अंतिम नियंत्रण असते. संभाव्य शोषणकर्त्याने मुलाभोवती पालक आणि

परिवाराच्या सदस्यांप्रमाणे असलेल्या लोकांना देखील असेच भासवणे आवश्यक आहे. ते लोक प्रौढांचा विश्वास अनेक मार्गांनी संपादन करतात.

तयारी करणे ही सूक्ष्म कपटी आणि संथप्रक्रिया आहे, कोणतीही लैंगिक कृती करण्यापूर्वी कोणतीही अनुचित वागणूक न दाखवता देखील शोषणकर्ता मुलाची बरेच आठवडे, महिने अथवा अगदी वर्षे देखील जोपासना करू शकतो. जोपासना करणे शोषणकर्त्यासाठी महत्वाचे आहे कारण त्यामुळे मुलाकडे जाणे शक्य होते आणि गुन्हा उघडकीस येण्याची अथवा सापडला जाण्याची संभावना देखील कमी होते..

परंतु, तयारी करणे अगदी काही मिनिटांत देखील होऊ शकते. हे तेव्हा घडू शकते जेव्हा सामाजिक मूल्ये आणि अपेक्षा शोषणकर्ता मुलांविरोधात वापरतात. उदाहरणार्थ, मुलाला सांगणे की त्याने त्याच्या वरिष्ठांची आज्ञा पाळणे आवश्यक आहे अथवा शोषणकर्ता शिक्षक असल्यास मुलाला नापास करण्याची भिती घालणे. या प्रकारे शोषणकर्त्याला त्यांचे वागणे चालू ठेवण्यास आणि बाल लैंगिक शोषण परत परत घडू देण्यास सर्व समाज मान्यता देतो.

प्रश्न iii

## तुम्हाला असे वाटते का की मुले “प्रक्षोभक” पोशाख घालून शोषणास आमंत्रण देतात?

आपला समाज नेहमी बळी गेलेल्यांवरच दोष लादून शोषणकर्त्यांना मात्र माफ करतो हे क्लेशदायक आहे(मुले शोषण झाल्याचे सांगत नसल्याचे हे प्रमुख कारण आहे). तरीदेखील, शोषणकर्त्याच्या बळी गेलेल्या मुलाला दोष लावण्याच्या हेतुव्यतिरिक्त एखाद्याने केलेल्या पोशाखाच्या प्रकारामुळे अथवा वागणुकीमुळे लैंगिक शोषण होत नाही.

जर आव्हानात्मक पोशाख घालणे हे बाल लैंगिक शोषणाचे कारण असते तर तीन महिन्यांच्या लहान मुलांचे लैंगिक शोषण झाले नसते. बाल लैंगिक शोषणाची जबाबदारी ही शोषणकर्ताची एकट्याचीच आहे. शोषणकर्त्यालाच संभोगाचे आकर्षण असते आणि हे आकर्षण त्याला अथवा तिला मुलांची आणि त्यांच्या भोवतीच्या लोकांची तयारी करण्यास भाग पाडते.

आपण मुलांना जे आवडेल ते पोशाख घालण्याचे स्वातंत्र्य आणि स्वातंत्र्यासमवेतच जबाबदारी येते ही जाणीवही देणे आवश्यक आहे. आपल्याला समजले पाहिजे की शोषणकर्ता ज्यांच्यावर समाजाकडून सामाजिक नियम आणि राहणीमान पाळण्याचा आरोप केला जाऊ शकतो अशाच मुलांना निवडेल.

प्रश्न iv

## मनोविकारी आणि अश्लिलरीत्या (पेडोफाइल्स आणि हेबोफाइल्स) विकृत कोण असतात?

पेडोफाइल्स म्हणजे जे मुलांकडे लैंगिकरीत्या आकर्षित होतात आणि केवळ लहान मुलांसमवेत संभोग करणे पसंत करतात. त्यांना प्रौढांबरोबर संभोग करण्यामध्ये कोणतेही अथवा थोडेसेही सुख मिळत नाही. हेबोफाइल्स केवळ पौगंडावस्थेतील मुलांशी संभोग करणे पसंत करतात.

पेडोफाइल्स आणि हेबोफाइल्स कुणीही असू शकतात. - वृद्ध अथवा तरुण, श्रीमंत अथवा गरीब, शिकलेले अथवा अशिक्षित, अव्यावसायिक अथवा व्यावसायिक आणि कोणत्याही जातीचे अथवा धर्माचे. वय अथवा लिंगाबाबत त्यांच्या स्वत:च्या आवडी असतात. लैंगिक गुन्हेगार म्हणून वावरणारे अनेक जण पुरुष असतात, पण अनेक संख्येने स्त्रिया देखील शोषणकर्ता म्हणून पकडल्या गेल्या आहेत, जसे की, अमेरिकेतील शिक्षिका आणि त्यांचे प्रमाण वाढत आहे.

शोषणकर्त्यांच्या पूर्व इशार्यांच्या चिन्हांत पुढील गोष्टींचा समावेश होतो:

अ. प्रौढांपेक्षा लहान मुलांसमवेत अधिक आरामदायी असल्याचे दाखवणे;

ब. लहान मुलांना मोहक आणि मादक असल्याचे दाखवणे;

क. मुलांबरोबर एकटे रहाण्याचा प्रयत्न करणे;

ड. वैयक्तिकरीत्या मुलांना विशिष्ट वागणुकीसाठी बक्षिस देणे आणि

ई. मुलांचे लक्ष वेधण्याकरता त्यांना एकेकटे ओढणे.

याची नोंद घेणे महत्वाचे आहे की हे केवळ निर्देशक आहेत आणि हे गृहित धरता कामा नये की अशा गुणधर्माच्या व्यक्ती संभाव्य लैंगिक गुन्हेगार असतीलच. अशा गुणधर्मांचे ज्ञान आणि सातत्याने निरिक्षण हे सावधानतेचा इशारा म्हणून वापरता येऊ शकतात.

लहान मुलांशी संभोगाच्या इच्छा असलेल्या अनेक पुरुष आणि स्त्रिया त्यांच्या इच्छेचे पालन करत नाहीत. अनेकांना हे चुकीचे असल्याचे माहित असते, त्यांना मुलांना इजा पोचवायची नसते, अथवा त्यांना तुरुंगवास अथवा सामाजिक लज्जा नकोशी असते.

जेव्हा मुलाभोवतीचे प्रौढ हे पूर्वसूचनेच्या चिन्हांवरून सावध होतात आणि अशा प्रकारच्या वागणे असलेल्या प्रौढांशी समर्थनात्मक पद्धतीने वागतात, ते लहान मुलांना सुरक्षित वातावरण पुरविण्यास मदत करतात.

प्रश्न v

## अज्ञानांसमवेत लैंगिक कृती करणार्या अज्ञान मुलांबाबत तुम्हाला काय म्हणायचे आहे?

सर्व लोक, ज्यात लहान मुलांचा समावेश देखील आहेत, हे लैंगिक मानव आहेत - मनो-लैंगिक विकास हा शारीरिक, दृष्टिकोनात्मक, भावनिक, आध्यात्मिक आणि सामाजिक विकासाइतकाच महत्वाचा आहे.
विकसनशील उत्सुकतेचा भाग म्हणून लैंगिक वर्तनात जी मुले गुंतवली जातात ती साधारणपणे लाजतात, हसतात आणि त्यांच्या वयाच्या इतर मुलांशी ती हे वर्तन करतात. अशा स्थितीत दोन्ही मुले ही “लैंगिक खेळ” यात उत्सुकतेपोटी गुंतलेली असतात आणि एक मूल दुसर्या मुलाकडे पुढाकार घेतेच असे आवश्यक नाही. जेव्हा या मुलांना हे थांबविण्यास सांगितले जाते, ती थांबतात.
जेव्हा मुले थांबत नाहीत, जेव्हा ती जबरदस्तीने इतर मुलाकडे पुढाकार घेतात अथवा जेव्हा ते भिती अथवा अनैसर्गिक रस दाखवतात, ती असे अनेक कारणांनी करत असू शकतात. उदाहरणार्थ, मुलांनी लैंगिक शोषणाचा अनुभव घेतलेला असू शकतो अथवा त्यांच्या पर्यंत पोहोचणाऱ्या वयाला अनुचित संदेशांमुळे संभोग आणि लैंगिकतेबाबत ती गोंधळलेली असू शकतात.
मूल लैंगिक शोषणकर्त्याच्या पूर्व टप्प्यांवर असू शकेल. हे माहिती होणे महत्वाचे आहे की लहान मुलांमधील आणि तरुणांमधील लैंगिक दुर्वर्तनाला कशा प्रकारे प्रतिसाद दिला पाहिजे. लैंगिक दुर्वर्तन ओळखणे आणि लवकरच्या टप्प्यांवर लाज अथवा अपराधीत्व न बाळगता उचित लैंगिकता शिकवण्यामुळे मुलांना त्यांच्या विकासात मदत करते आणि त्यांना भवितव्यात लैंगिक शोषणकर्ता बनण्यापासून रोखण्यास मदत करते.

प्रश्न vi

## शोषणकर्त्याला समजावणे आणि सल्ला देणे शक्य आहे का? याची किती मदत होऊ शकते?

लैंगिक शोषणकर्त्यांशी सल्लामसलतीसाठी आणि व्यवस्थापित करण्यासाठी अनेक प्रभावी मार्ग आहेत.

भारतामध्ये याबाबतीत पुढे समजून घेण्यासाठी अविरत काम चालू आहे. पोलिसांसकट प्रत्येकाने गुन्हेगारांना मदत करणे महत्वाचे आहे.

शोषणकर्त्यांनी समजून घेण्याचे शिकणे आणि त्यांच्या लैंगिक इच्छा नियंत्रित करणे आवश्यक आहे (कधीकधी ध्यानधारणेच्या सहाय्याने देखील); त्यांनी निर्णय घेण्याची चांगली तंत्रे शिकून घेणे आवश्यक आहे; त्यांनी त्यांच्या वर्तनाची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे आणि त्यांनी केलेल्या गोष्टींमुळे इतरांना इजा होते हे समजून घेणे आवश्यक आहे (समानुभूती)

शोषणकर्ता जितका तरूण असेल तितके त्यांना बदलणे अधिक सोपे असते. आम्हाला आढळले आहे की तरूण शोषणकर्त्यासमवेत काम करणे

आणि त्यांना बदलणे अधिक सोपे आहे कारण ते पर्यवेक्षणासाठी आणि सल्ल्यासाठी अधिक खुले असतात.

शोषणकर्त्याबाबतीत विशिष्ट उपचारपद्धतींबाबत अमेरिकेसारख्या देशांमधील उपचारपद्धतींना यश मिळाले आहे. परंतु समस्या अशी आहे की अनेक गुन्हेगार कधीही पकडले जात नाहीत म्हणून त्यांना आवश्यक मदत कधी मिळत नाही.

# 4



# जाहीर प्रकटन

प्रश्न i

## मुले शोषणाबाबत तातडीने का सांगत नाहीत?

अनेक कारणे आहेत ज्यासाठी मुले शोषणाची घटना व्यक्त करत नाहीत अथवा कधीही जाहीर सांगत नाहीत:

अ. विशिष्ट स्थितींमध्ये मुलांना लिंग आणि लैंगिकतेबाबत शिकवले जात असल्यामुळे मुले अशा घटना उल्लंघनाच्या नजरेतून अथवा असाधारण / अनैसर्गिक दृष्टीतून बघत नाहीत. विशेषत: जर लैंगिक शोषण हे कायम अशाप्रकारे असेल की लहान मूल त्याला सभ्य आणि प्रेमाचे समजत असेल तर असे घडते. “सुरक्षित” आणि “असुरक्षित” स्पर्शाबाबतच्या समजेचा अभाव बाल लैंगिक शोषणाबाबतीत गैरसमज होऊन प्रेम असल्याचे समजले जाऊ शकते आणि शोषणकर्त्याबाबतीत प्रेम आणि काळजी करणारा कुणी असे समजले जाऊ शकते.

ब. काही परिस्थितींमध्ये जेव्हा मुले उल्लंघन झाल्याचे कळवितात, त्यांना गोंधळल्यासारखे वाटते आणि ते संपर्क साधण्यास घाबरतात.

त्यांच्या गोंधळासोबत अनेक प्रकारच्या चिंता असतात, जसे ते प्रेम करत असलेल्या व्यक्ती अडचणीत येतील की काय, ते स्वत: कुठल्या अडचणीत सापडतील का आणि पुढे काय घडेल.

क. अनेकदा मुलांना भिती वाटते की त्यांच्यावर कुणी विश्वास ठेवणार नाही, विशेषत: जर शोषणकर्ता हा कुणी प्रख्यात आणि परिवार प्रेम करत असलेली व्यक्ती असेल आणि कदाचित कुणी सत्तेत असलेली व्यक्ती देखील असू शकेल.

ड. मूल / तरूण घडलेल्या घटनेबाबतीत आरोप होण्याची भिती बाळगत असू शकेल - शोषणकर्त्याने निवडल्याबद्दल, शोषणकर्त्यास उपलब्ध असल्याबद्दल आणि शोषणकर्त्याचे आज्ञापालन केल्याबद्दल.

ई. मुलाला बळी असा शिक्का बसेल, त्याने कुणाचीही मदत घेतली नाही आणि शोषणाबाबत कळवले नाही ह्याबद्दल लाज वाटू शकेल.

फ. मुलाला पालकांचे प्रेम मिळणार नाही याची भिती वाटत असेल अथवा अगदी शोषणकर्त्याचे प्रेम मिळणार नसल्याची असल्याची भिती देखील वाटू शकत असेल(जो नेहमीच्या माहितीतील व्यक्ती / नातेवाईक / काळजी करणारा असेल). मुलाला मैत्री हरवली जाण्याची देखील भिती वाटत असू शकेल.

ग. मुलाला अथवा त्याच्या / तिच्या परिवाराला शोषणकर्त्याने इजा पोचवण्याच्या धमकीची भिती वाटत असू शकते.या कारणांसाठी शोषण स्वत:पुरते मर्यादित ठेवण्यासाठी, मुले अनेकदा स्वत:ची समजूत घालतात की जे घडले ते एक केवळ स्वप्न होते अथवा अपघात होता अथवा त्यांनी केवळ तशी कल्पना केली - अथवा ते स्वत:ची समजूत घालतात की जे घडले त्याबाबत ते समजून घेऊ शकतात कारण ते सांगणे अधिक वाईट स्थिती निर्माण करेल.

प्रश्न ii

## मुले शोषणाबाबत कधी सांगतात?

मुलांना शोषण जाहीर करण्यासाठीचा सगळ्यात महत्वाचा घटक म्हणजे मदतीचे, विश्वासू आणि सहानुभूतीचे वातावरण. मुले, साधारणपणे, त्यांना सुरक्षित वाटत असलेल्या लोकांकडेच व्यक्त होतात. त्यांचे ऐकणार्या, मदत करणार्या आणि घडलेल्या घटनांसाठी त्यांच्यावर आरोप न करणार्या लोकांवरच ते विश्वास ठेवतात.

इतर अनेक स्थिती आहेत ज्यामुळे मुल शोषणाचे प्रकटन करण्यास प्रवृत्त होते.

अ. जेव्हा शोषणकर्ता इतर कुणाला त्रास देऊ लागतो, जसे भावंड अथवा मित्र, बळी व्यक्ती त्या शोषणकर्ता व्यक्तीचे संरक्षण करण्यासाठी प्रकटन करते.

ब. जेव्हा मूल अधिक वेदना आणि जखमा सहन करू शकत नाही.

# 5



# प्रभाव आणि उपचार

प्रश्न i

## CSA चा मुलांवर / प्रौढांवर काय प्रभाव पडतो??

बाल लैंगिक शोषणाचे परिणाम वाईट आणि अनेक आहेत. लैंगिक शोषणाचे प्रभाव लहान मुलांच्या आयुष्यावर शरीरक्रियात्मक, मानसिक आणि सामाजिक स्तरांवर आणि लैंगिक वर्तनाच्या नमुन्यांवर देखील पडत असतात.

शारिरिक प्रभाव यात गर्भारपण, योनी आणि गुदद्वार भागांत फाटणे, लैंगिक संबंधातून आजार होणे, रक्तस्त्राव होणे अथवा जननेंद्रियांतून संक्रमणामुळे घाण वास येणे, परत परत लघवीमार्गात संक्रमण होणे, आंतड्याला इजा होणे, अनैच्छिक मुस्कटदाबी आणि मनोवैज्ञानिक आजार ज्यात लैंगिकदृष्ट्या जठर व आतड्यांसंबंधी समस्या आणि वारंवार डोकेदुखी यांचा समावेश असतो.

शरिरक्रिया प्रभाव यात लोकांची असाधारण भिती अथवा जागांची भिती, रात्रीची भयानक स्वप्ने, खाणे आणि झोपण्यातील व्यत्यय, चिंता, अती

सतर्कता, चिकटण्याचे वर्तन, वारंवार दिवास्वप्न बघणे, विच्छेदन, स्वत:वरील आणि इतरांवरील विश्वासाचा अभाव, प्रतीगमन दर्शवणारी वर्तने जसे अंगठा चोखणे, पलंग ओला करणे, आणि स्वच्छतागृह सोडून इतरत्र शौच करणे. अधिक सखोल प्रभाव म्हणजे आत्महत्या करणे असू शकतो.

सामाजिक प्रभाव यात अचानक लोकांत मिसळणे कमी होणे, अती आनंदित वागणे, वाढलेले आदरातिथ्य, आक्रमकता, आणि शैक्षणिक कामगिरीमध्ये अचानक बदल.

बालपणातील लैंगिक शोषणामुळे लैंगिक वर्तनामध्ये आणि शिष्टाचारांमध्ये अतिशय गंभीर आणि दृश्य बदल होऊ शकतात. यापैकी काही अतिरिक्त पोशाख घालणे, कमी कपडे घालणे, लैंगिक चिंता, आणि अती हस्तमैथुन करणे, सातत्याने लैंगिक खेळ खेळणे, लैंगिक अश्लील भाषा वापरणे अथवा इतरांकडे लैंगिक आक्रमकता दाखवणे अशा लैंगिक वर्तनाची पुनरावृत्ती यांचा समावेश होतो.

शोषणाचा परिणाम विविध घटकांनुसार जसे लिंग, लैंगिकता, आणि वयानुसार वेगवेगळा असेल. इतर घटक आहेत जे प्रभाव ठरवतात ज्यात गुन्हेगारांशी बळी गेलेल्या व्यक्तीचे नाते, लैंगिक शोषणाचे स्वरुप (किती वारंवार, कधी, किती शोषणकर्ते), बळी व्यक्तीभोवतीची आधार प्रणाली,बळी व्यक्तीची शोषणावेळची मनस्थिती यांचा समावेश होतो. लघुकालीन प्रभाव आणि दीर्घकालीन प्रभाव यांना वेगळे करणे अवघड आहे कारण दीर्घकालीन प्रभाव हा दीर्घकालीन समस्येचे कारण असू शकते.

काही दीर्घकालीन प्रभाव खालीलप्रमाणे असू शकतात:

a) विश्वासू माणसाने केलेल्या विश्वासघाताचा मुलाने घेतलेला अनुभवामुळे एक प्रकारचे एकलकोंडेपण आणि निकटच्या नातेसंबंधांविषयी आणि परस्परांतर्गत प्रेरक शक्तींबाबत तिटकारा निर्माण होऊ शकतो. यामुळे सीमांची संवेदना संदिग्ध होऊ शकते ज्यामुळे भवितव्यातील शोषण आणि परत बळी होण्याची असुरक्षितता त्यांच्या मनात घर करून रहाते.

b) कलंक लागण्याच्या अनुभवामुळे आत्मसन्मान कमी होतो, अपराधीत्व येते, लज्जा वाटते आणि एक प्रकारची एकलकोंडी वृत्ती निर्माण होते.

c) शक्ती नसल्याच्या अनुभवामुळे नैराश्य, माघार, अथवा असामाजिक वर्तन (ड्रग्ज, मद्यपान) आणि अपराधी कृत्ये ज्यात लैंगिक आक्षेपार्ह वर्तने आणि स्वत: केलेल्या शोषणाची कृती परत करणे यांत परिवर्तन होऊ शकते.

d) लहानपणातील लैंगिकतेच्या अनुभवांमुळे अनिर्बंध लैंगिक वर्तन अथवा मागील शोषणाच्या अनुभवाच्या आठवणींमुळे लैंगिक तिटकारा, भावनोत्कटता, कामोन्माद यांत अडचणी येणे तसेच स्वत:बद्दल आणि लैंगिकतेबाबत नकारात्मक वृत्ती निर्माण होणे यात देखील परिवर्तन होऊ शकते.

अंतिम टीप म्हणून, लैंगिक शोषण अनुभवाला आलेल्या मुलांवर जेव्हा विश्वास ठेवला जातो आणि त्यांच्या पालक / विश्वस्त प्रौढ / प्रेमाच्या माणसांकडून आधार दिला जातो, तेव्हा ते लवकर बरे होतात. खरोखर, विशेषत: शोषणाआधीच्या मजबूत भावनिक आधार प्रणालीमधील काही मुले आणि प्रौढ बळी गेलेल्या व्यक्ती बाल लैंगिक शोषणाचा काही परिणामच कदाचित दाखवणार नाहीत. अंतत: हे लक्षात ठेवणे महत्वाचे आहे की शोषणाच्या परिणामांबाबत जागरुक राहणे जितके महत्वाचे आहे, तितकेच एका व्यक्तीची वागणूक / वागणुकीतील बदल आणि त्यांच्या बाल लैंगिक शोषणाबाबतच्या अनुभवांमध्ये संबंध जोडण्याचे गृहित न धरणे महत्वाचे आहे.

**प्रश्न ii**

## शोषण झालेले मूल सामान्य जीवन जगू शकेल असे तुम्हाला वाटते का?

होय. लैंगिक शोषण हे युद्ध, गरिबी, चोरी, हत्या, पूरस्थिती आणि आवडत्या आजीच्या मृत्यूसारख्या अनेक वाईट अनुभवांप्रमाणेच एक आहे. लैंगिक शोषणाची पीडित मुले सामान्य आणि निकोप

जीवन जगू शकतात. ते वेदनेकडे दुर्लक्ष करणे शिकू शकतात. या शोषणाचा त्यांच्यावर काय परिणाम झाला याबद्दल जागरूकता निर्माण करण्याकडे ते लक्ष देऊ शकतात, जेणेकरून अशा बाधित क्षेत्रांवर काम करून त्यात सुधारणा करू शकतील. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये त्यांना विशेष करून आधाराची गरज असते. यासाठी काहीवेळा योग्य उपचारतज्ज्ञाची गरज असते, तर काही वेळा काळजी घेणारी एखादी प्रौढ व्यक्ती देखील पुरेशी ठरू शकते.

अनेक प्रकरणांमध्ये, केवळ त्यांची माया असलेल्या किंवा विश्वासाच्या व्यक्तींनी त्यांचे ऐकून घेतले आणि आधार देण्याचे वचन दिल्यानंतर त्यांचे जीवन बदलून गेले आहे. अशा प्रकारे, एकदा आपण एखाद्या पीडित व्यक्तीचा विश्वास जिंकला की मग आपण त्यांना इतर संसाधनांकडे वळवू शकतो, जेणेकरून त्यांना अधिक मदत मिळू शकेल.

प्रश्न iii

## या परिणामांवर मात करण्यासाठी आपण पीडितांची कशी मदत करू शकतो?

अशावेळी पीडितासाठी  सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आधार असतो, आणि तो आधार खास करून काळजी घेणाऱ्यांकडून मिळावा. आधार यंत्रणेत खालील गोष्टी असाव्यात:

a) पीडिताच्या दृष्टीकोनाला समजून घेणे,

b) त्या मुलाला/युवाला दोष देऊ नये,

c) त्या मुलाला/युवाला आपल्या भावना मोकळेपणाने व्यक्त करू द्या,

d) बरे होण्याच्या पूर्ण कालावधीमध्ये आधार असावा.

काही प्रकरणांमध्ये, पीडित किंवा पीडिता आपणहून सामान्य होऊ शकतो/शकते, खास करून जे घडले त्यात ती त्यांची चूक नव्हती आणि त्या गोष्टीची पुनरावृत्ती होण्यापासून ते स्वतःचे भविष्यात कसे रक्षण करू शकतील हे समजल्यावर त्यांच्यामध्ये निश्चितच सुधारणा होऊ शकते.

इतर जणांमध्ये, पीडितांना व्यावसायिक मदतीची गरज भासू शकते, उदाहरणार्थ, समुपदेशन किंवा मनोरुग्णाची देखभाल. मुले आणि प्रौढांमधील कुटुंबाचा आणि व्यावसायिक आधार आघातजन्य अनुभवानंतर देखील त्यांच्यात पूर्ववत होण्याची आणि उत्कर्ष होण्यामध्ये मदत करू शकतो आणि अनेकदा ते साध्य होते.

# 6



# कायदेशीर हस्तक्षेप

प्रश्न i

## मुलावरील लैंगिक शोषणाच्या प्रकरणी पोलिसांमध्ये तक्रार नोंदविणे अनिवार्य आहे का?

होय. लैंगिक शोषणापासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ (POCSO) च्या खंड १९च्या अनुसार लैंगिक शोषणाच्या प्रकरणाला पोलिसांमध्ये कळविणे अनिवार्य आहे. या कायद्यात असे म्हटले आहे: 'अशी कोणतीही व्यक्ती (एखाद्या बालकासहित), जिला असे वाटते की या अधिनियमाच्या अंतर्गत एखादा गुन्हा होण्याची शक्यता आहे किंवा एखादा गुन्हा घडल्याची माहिती असेल, तर तिने अशा माहितीस, (अ) अल्पवयीनांसाठी असलेले विशेष पोलीस युनिट; किंवा (ब) स्थानिक पोलीसांना ती माहिती पुरवावी.'

२२ फेब्रुवारी २०१३ रोजी शिक्षण मंत्रालय, महाराष्ट्र राज्यद्वारा जाहीर केलेल्या परिपत्रकामध्ये देखील शाळांसाठी जर लैंगिक अत्याचाराची अशी एखादी घटना नजरेस आली तर तिला कळविणे अनिवार्य केले आहे.

प्रश्न ii

## एकदा शोषणाची तक्रार नोंदवली, की मग पोलीस काय कारवाई करतील?

जर तो गुन्हेगार त्या मुलाच्या ओळखीचा असेल, तर त्या गुन्हेगाराला त्वरित अटक करण्यात येईल. लैंगिक शोषणापासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ (POCSO) च्या अंतर्गत शोषण किती झाले आहे हे लक्षात न घेता एक वैद्यकीय परीक्षण करणे अनिवार्य आहे. मूल आणि गुन्हेगार दोघांना वैद्यकीय परीक्षणासाठी पाठविले जाऊ शकते. पोलीस त्या घटनेच्या वेळी त्यांनी घातलेल्या कपड्यांना पुरावा म्हणून ताब्यात घेतील. त्या मुलाचा जबाब नोंदवून घेतले जाईल. त्या मुलाचा विश्वास असलेले आणखी काही लोक असल्यास, त्यांच्या जबाबांना देखील नोंदवून घेतले जाईल.

पीओसीएसओ अधिनियम२०१२ च्या अंतर्गत, तपास चालू असताना त्या मुलाचे रक्षण करण्यासाठी विशेष संरक्षक उपाययोजना विहित केल्या आहेत. उदाहरणार्थ, त्या मुलाला जबाब नोंदविण्यासाठी बोलाविले जाऊ शकणार नाही. जर ते बालक एक मुलगी असेल, तर केवळ महिला पोलीस अधिकारीच तिचा जबाब नोंदवून घेतील. त्या मुलाचा जबाब त्याच्या घरांमध्ये किंवा अन्य कोणत्याही अशा स्थळी, जेथे त्या मुलाला सुरक्षित वाटेल अशा ठिकाणीच घेतला जाईल.

त्या मुलाच्या परिसरास भेट देणारे पोलीस अधिकारी सामान्य पोशाखात असावेत. तपास आणि खटल्यादरम्यान त्या मुलाची ओळख सुरक्षित ठेवली जाईल आणि गोपनीय राहील.

प्रश्न iii

## CWC काय आहे आणि मुलाला CWC समोर केव्हा आणले जाते? मुलांच्या लैंगिक शोषणाच्या प्रकरणी CWCची कोणती भूमिका असते?

CWC चं अर्थ चाईल्ड वेलफेअर कमिटी किंवा बाल कल्याण समिती असा आहे. एखाद्या मुलाच्या घराचा परिसर सुरक्षित आहे किंवा नाही हे तपासणे आणि जर नसल्यास, एखाद्या बालगृहामध्ये सरकारी संरक्षणात्मक निगेमध्ये त्या मुलाला दाखल करून घेणे या समितीचे काम असते. सहसा, जेव्हा पण एखाद्या लैंगिक शोषणाच्या प्रकरणाची नोंद होते, तेव्हा प्राथमिक तपासानंतर त्या मुलाला CWC समोर आणले जाते. जर त्याच्या पालकांनी त्या मुलाच्या संरक्षणाची खात्री दिली, तर त्या मुलाला बालगृहात ठेवले जात नाही. महाराष्ट्रातील सीडब्ल्यूसीची यादी एका जोडपत्राच्या स्वरूपात दिली आहे.

प्रश्न iv

## मुलावरील लैंगिक शोषणाचा समावेश असलेल्या एखाद्या प्रकरणातील खटला चालताना न्यायालयाने कोणत्या संरक्षण उपाय योजना केल्या पाहिजेत?

लैंगिक शोषणापासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ आणि त्याच्या अंतर्गत बनविलेले नियम बालकांसाठी अनुकूल अशा विशेष कार्यप्रणालीस आणि १८ वर्षांखालील मुलांच्या लैंगिक अत्याचाराच्या संदर्भातील सर्व खटले चालविण्यासाठी एका विशेष न्यायालयाला विहित करतात.

पीडित मुलासाठी त्या खटल्याच्या संपूर्ण प्रक्रियेला कमी त्रासदायक बनविण्यासाठी खालील संरक्षक उपाययोजनांचा समावेश केला आहे:

a) जर ते मूल न्यायालयासमोर येण्यासाठी घाबरत असेल, तर त्या मुलासाठी व्हिडियो कॉन्फरन्सिंगद्वारा साक्ष देण्याची सुविधा दिली जाते.
b) न्यायाधीश, सरकारी अभियोक्ता आणि प्रतिवादी वकील यांच्यासह सर्व लोक न्यायालयाच्या औपचारिक पोशाखात न राहता सामान्य पोशाखात राहतील. बसण्याची व्यवस्था वेगळी असावी आणि औपचारिक न्यायालयाप्रमाणे कठोर स्वरूपाचे नसावे. कार्यवाही सुरु होईपर्यंत त्या मुलाला न्यायालयाच्या खुल्या कक्षात न बसविता, आधार व्यक्तीसह एका विशेष खोलीत प्रतीक्षा करण्यास बसवावे, जेथे खेळणी आणि अल्पोपहाराची पर्याप्त व्यवस्था असावी.

c) या खोलीतून न्यायालयाच्या कक्षास जाण्यास एक स्वतंत्र मार्ग असावा. त्या मुलाला साक्षीदाराच्या पिंजऱ्यात उभे न करता बसण्यास द्यावे आणि जबानी घ्यावी आणि या साक्षीच्या दरम्यान त्या मुलाला पुरेशी विश्रांती द्यावी.

d) या विश्रांतीदरम्यान त्या मुलाला पाणी पिऊ द्यावे किंवा अल्पोपहार घेऊ द्यावे. जर ते मूल घाबरले किंवा साक्षी देऊ शकत नसेल तर ते प्रकरण स्थगित करावे किंवा लांबणीवर टाकावे, अन्यथा त्या मुलाची तपासणी आणि उलटतपासणी एकाच दिवशी पूर्ण करण्यात यावी.

e) समुपदेशक किंवा आधार देणाऱ्या व्यक्तीने साक्षीच्या वेळी त्या मुलाच्या बाजूला बसावे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, त्या मुलाच्या थेट उलटतपासणीस कधीही अनुमती देऊ नये. प्रतिवादी वकिलाने न्यायाधीशांना लिखित स्वरूपात प्रश्न द्यावेत आणि न्यायाधीशांनी साध्या आणि भयभीत न करणाऱ्या स्वरूपात त्या प्रश्नांना त्या मुलासमोर ठेवावेत.

f) जर ते मूल त्या न्यायालयाची भाषा समजू शकले नाही किंवा त्याला कोणतेही अपंगत्व असल्यास किंवा ऐकण्याची क्षमता नसल्यास, एखाद्या अनुवादकास किंवा कुशल व्यक्तीस त्या साक्षीच्या दरम्यान उपस्थित करावे.

**प्रश्न v**

## संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी कोणती कालमर्यादा आहे?

अगोदर, अशा खटल्यांना सुमारे एक ते दीड वर्षे कालावधी लागत होता. परंतु, लैंगिक शोषणापासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ च्या अंतर्गत संपूर्ण प्रकरणे तातडीने निकालात काढण्याची अपेक्षा केली जाते. एफआयआर दाखल केल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत पोलिसांद्वारा तपास पूर्ण केला जाण्याची अपेक्षा केली जाते. त्यानंतर, विशेष न्यायालय त्या प्रकरणाची नोंद घेईल आणि आरोपांची निश्चिती करेल, ज्याच्या अंतर्गत त्या आरोपीवर खटला भरला जाईल. हे महत्त्वाचे आहे कारण शिक्षा सिद्ध होणाऱ्या नेमक्या आरोपानुसार दिली जाईल. तपासणी पूर्ण झाल्यानंतर खटला सुरु होण्यास सुमारे एक महिना लागेल.

ट्रायल कोर्ट (ज्याला सत्र न्यायालय म्हणून खास नामित केलेले असते) खटला चालवेल आणि त्या न्यायालयाने आरोपांची निश्चिती केल्याच्या तारखेपासून सुमारे दोन महिन्यांच्या आत खटल्यास निकाली काढेल. खटला एकदा सुरु झाल्यानंतर, त्या मुलाला त्याची/तिची जबानी देण्यासाठी एकदा किंवा दोनदा न्यायालयात बोलाविले जाईल.

सामान्यपणे, एखाद्या विशिष्ट प्रकरणात, संपूर्ण प्रक्रिया पोलीस स्थानकात पहिली तक्रार दाखल केल्याच्या तारखेपासून एका वर्षात पूर्ण केली जाईल. तथापि, हा कायदा नवीन आहे आणि बहुतेक न्यायालयांमध्ये यंत्रणा पूर्णरूपाने कार्यान्वित झाली नसल्याने प्रक्रिया हळूहळू विकसित होत आहे.

**प्रश्न vi**

## सभोवताली असलेल्या समस्यांना आपण कसे संबोधन करू शकतो? प्रतिवादी दोषी आहे किंवा नाही याचा अर्थ काय आहे?

एकदा एफआयआर (फर्स्ट इन्व्हेस्टिगेशन रिपोर्ट) दाखल केली आणि न्यायालयाद्वारे आरोपनिश्चिती झाली, की मग त्या आरोपीला आपल्या गुन्ह्याची कबुली देण्यास सांगितले जाते, म्हणजेच त्याच्यावर लावलेल्या आरोपांना स्वीकारण्यास सांगितले जाते. सहसा तो आरोपी आरोपांचा स्वीकार करत नाही. म्हणजेच, आरोपांना नाकारतो आणि खटल्यास आरंभ होतो. खटल्याच्या शेवटी, त्या व्यक्तीला दोषी ठरविले जाते किंवा आरोपमुक्त केले जाते. ती घटना आणि त्या मुलाने मोठ्या लोकांना ती घटना केव्हा कळविली यांच्यातील कालावधी, आणि मोठे लोक पोलीस स्थानकाला केव्हा गेले आणि तक्रार दाखल केली अशा तथ्यांच्या विविधतांवर हे अवलंबून असते. जेवढा अधिक विलंब होतो, तेवढे गोळा केलेले पुरावे कमजोर होत जातील आणि प्रकरण सिद्ध करण्यात अपुरे ठरतात.

बहुतेक प्रकरणांमध्ये, कोणत्याही वैद्यकीय किंवा न्यायसहायक पुराव्यांच्या आधाराशिवाय त्यात केवळ त्या मुलाचे शब्द असतात. यामुळे मुलाच्या लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणास सिद्ध करणे कठीण बनते. जर गुन्हेगार पिता किंवा जवळचा नातेवाईक असेल किंवा घरातील कमवती व्यक्ती असेल, तर या खटल्यास कदाचित त्याची आई किंवा कुटुंबातील सदस्य समर्थन करणार नाहीत आणि पुराव्यांसह पुढे येणार नाहीत.

आपण हे ध्यानात घेणे अत्यंत जरुरी आहे की आपला दोष सिद्ध होण्याचा दर अतिशय कमी आहे. मुलावरील लैंगिक शोषणाच्या प्रकरणी दोष सिद्ध होण्याचा दर केवळ १०% च्या जवळपास आहे. (सर्वसाधारण दोष सिद्ध होण्याच्या दरापेक्षा फारच कमी आहे, जो सुमारे 26% आहे)

त्यामुळे आपण त्या आरोपीला दोषमुक्त समजू शकत नाहीत किंवा त्या जागी अत्याचार घडला नाही हे सिद्ध करू शकत नाही. जर हे केले, तर ते त्या मुलासाठी अतिशय नाउमेद करणारे ठरेल, ज्याने मूकपणे त्रास सहन करण्यापेक्षा गुन्ह्यास कळविण्याचे धैर्य दाखविले. या बाबत त्या मुलास जागरूक करणे आवश्यक आहे. आज ही गोष्ट कळविणे अनिवार्य आहे. पण त्याचा अर्थ असा होत नाही की प्रत्येक प्रकरणात दोष सिद्ध होईल. परंतु, एकदा हे प्रकरण पोलिसांना कळविले आणि आरोपीला खटल्याला सामोरे जावे लागले, तर संपूर्ण प्रक्रिया त्या आरोपीसाठी लज्जास्पद ठरू शकेल आणि त्या गुन्ह्याची कदाचित तो पुनरावृत्ती करणार नाही. तसेच, त्या गुन्ह्यास कळविणारे मूलदेखील अधिक धीट होऊ शकेल आणि त्याच्या कुटुंबातील सदस्य आणखी जागरूक होऊ शकतात.

एखादी दोषमुक्ती याचा अर्थ असा नाही की ते मूल खरे बोलत नव्हते. त्याचा अर्थ केवळ इतकाच होतो की हा खटला (पोलीस आणि सरकारी वकील) न्यायालयासमोर पुरेसे पुरावे आणू शकला नाही. यासाठी त्या मुलाला जबाबदार ठरविले जाऊ शकत नाही आणि त्या गुन्ह्यास कळविल्याबद्दल आणि दोषीपणा सिद्ध न झाल्याबद्दल त्याच्यात दोषी असल्याची भावना निर्माण केली जात नाही. एखादी दोषमुक्ती झाल्याबद्दल मानसिक आघाताला हाताळण्यासाठी, त्या मुलाला आणखी आधाराची आणि योग्य हस्तांतरणाची गरज असेल.

प्रश्न vii

## जर या खटल्यादरम्यान कुटुंब स्थानांतरण करते किंवा या प्रकरणातून माघार घेण्याचे ठरविते, तर ते शक्य आहे काय? अशा परिस्थितीत शोषणकर्त्याला मोकळे सोडले जाते का?

एकदा एफआयआर दाखल करण्यात आले आणि तपास पूर्ण झाला की मग, जर पोलिसांना आढळले की पुरेसे पुरावे आहेत, तर ती कागदपत्रे सरकारी वकीलाला पाठविले जातील आणि खटला सुरु होईल. ही एक गुन्हेगारी तक्रार आहे आणि खटला राज्य सरकारद्वारा भरण्यात आला आहे आणि स्वतंत्र पीडिताद्वारा भरण्यात आलेला नाही, त्यामुळे माघार घेणे किंवा 'प्रकरण मागे घेणे' संभव नाही. पीडित आणि त्याचे/तिचे नातेवाईक गुन्हेगारी खटल्यात केवळ साक्षीदार असतील.

ते मूल आणि तिचे कुटुंब कार्यवाहीला आरंभ करत नाहीत किंवा खटला चालवीत नाहीत. त्या मुलासाठी किंवा त्याच्या/तिच्या कुटुंबासाठी एकमेव मार्ग राहतो, तो म्हणजे न्यायालयामध्ये साक्ष उलटविणे आणि सरकारी वकीलाला समर्थन न करणे. याचा अर्थ, त्या पालकांनी किंवा त्या मुलाने आरंभी पोलिसांना सांगितलेल्या तथ्यांना न्यायाधीशासमोर सांगताना पूर्णपणे बदलून टाकणे. यामुळे तफावत निर्माण होईल आणि दोष सिद्ध करण्यास न्यायाधीशांना कठीण होईल. अशा देखील घटना आहेत, जेथे पीडिताने न्यायाधीशांसमोर न्यायालयात आरोपीस ओळखण्यास नकार दिला. ती पीडित व्यक्ती हे देखील सांगू शकते की आरोपी व्यक्ती त्याच्यावर/तिच्यावर अत्याचार करणारी व्यक्ती नाही आणि पोलिसांनी चुकीच्या व्यक्तीला पकडलेले आहे. माघार घेण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे त्या पालकांनी न्यायालयात येणे आणि न्यायाधीशांसमोर येऊन सांगणे की त्यांच्या मुलाला/मुलीला/पाल्याला न्यायालयासमोर यायचे नाही आणि या विधानाची नोंद करविणे.

जर पीडित आणि त्याच्या/तिच्या कुटुंबाने खटल्यादरम्यान समर्थन दिले नाही, तर न्यायाधीशांना आरोपीला दोषी ठरविणे शक्य होणार नाही. त्या पीडिताने न्यायालयात आरोपीला ओळखणे गरजेचे आहे. केवळ अत्यंत अपवादात्मक परिस्थितीमध्ये आणि त्या घटनेसाठी इतर प्रत्यक्ष साक्षीदार असले, ज्यांनी न्यायालयात येऊन त्या न्यायाधीशांच्या समक्ष त्यांनी अगोदर पोलिसांना सांगितलेली गोष्ट सांगितली, तरच न्यायाधीश आरोपीस दोषी ठरवू शकतील, मग पीडित आणि त्याचे/तिचे नातेवाईक साक्ष देण्यासाठी न्यायालयात आले नाहीत किंवा न्यायालयात त्यांनी साक्ष उलटवली तरीदेखील निकालावर फरक पडत नाही.

इतर सर्व प्रकरणांमध्ये, जर पीडिताने त्या आरोपीस न्यायालयात ओळखले नाही तर आरोपीस मुक्त केले जाईल.

प्रश्न viii

## जर कायदेशीर न्याय उपलब्ध नसेल, तर ते कुटुंब त्या मुलाच्या सुरक्षिततेची सुनिश्चिती कशी करू शकतील?

लैंगिक शोषण झालेल्या मुलाची अतिशय काळजी घेणे आणि त्याला नाजुकपणे हाताळणे आवश्यक असते. त्या मुलाला अगोदरच सांगणे आवश्यक असते की या प्रकरणात पूर्ण प्रयत्न करणे आपले कर्तव्य आहे, पण दोषी ठरविणे आणि मुक्तता करणे आपल्या हातामध्ये नाही. हे महत्त्वाचे असते, कारण त्या मुलाला माहिती असते की मुक्तता संपूर्ण प्रकरणात केवळ वकील सहाय्यक (परिपोषक) पुरावे उपलब्ध न करू शकल्यामुळे झालेली आहे. प्रत्येकाने सहकार्य करणे जरुरी आहे आणि सर्व भागधारक, पोलीस, वकील, आणि न्यायाधीशांनी आपापल्या भूमिका काळजीपूर्वक आणि संवेदनशीलतेने पार पाडणे आवश्यक आहे. जेव्हा प्रत्येक जण शोषणाच्या परिस्थितीमध्ये आवश्यक बदल घडवितो तेव्हाच खरा न्याय मिळतो.. म्हणजेच, ते मूल, ते कुटुंब, तो परिसर, त्याची शाळा, समाज हे सर्व सहभागी सकारात्मक बदल करतील. कायदेशीर न्याय हा न्यायाचा केवळ एक प्रकार आहे, त्याला प्राप्त करणे कठीण असते, आणि सहसा सर्वांनाच मिळेल असे नसते. त्या मुलाच्या सुरक्षिततेच्या सुनिश्चितीसाठी त्या मुलाला आणि कुटुंबाला सक्षम बनविले पाहिजे.

प्रश्न ix

## POCSO अंमलबजावणी योग्य रीतीने होत आहे काय?

भारत हा एक प्रचंड देश असल्यामुळे असे सर्वसामान्य विधान बनविणे आणि एक उत्तर देणे अतिशय कठीण आहे. पोलीस अधिकाऱ्यांमध्ये आणि इतर संबंधित भागधारकांमध्ये या कायद्याविषयी किती जागरूकता आहे यावर हे अवलंबून आहे.

मुंबईमध्ये आम्ही पाहिले आहे, की काही प्रकरणांमध्ये/परिस्थितींमध्ये याची अंमलबजावणी होत आहे आणि लोकांना याच्याबद्दल ज्ञान आहे; परंतु असे आढळून आले आहे की देशाच्या अन्य भागात ज्ञान कमी आहे आणि कायद्याची अंमलबजावणी फारशी सुरळीत होत नाही.

त्यामुळे कमीत कमी या कायद्याच्या अमलबजावणीकरिता साहाय्य होण्यासाठी पोलीस आणि जनता ह्यांच्यामध्ये जागृती पसरविली जाऊ शकते.

# 7



# तंत्रज्ञान आणि सीएसए

प्रश्न i

## आपल्याला तंत्रज्ञानाविषयी जाणून घेण्याची का आवश्यकता असते आणि त्याला लैंगिक शोषण झालेल्या मुलांच्या बाबतीत कशा रीतीने वापरले जाऊ शकते?

इंटरनेट आणि मोबाईल आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनले आहेत. आजच्या काळात, ऑनलाइन बनणे अनेक मुलांच्या जीवनाचा भाग बनले आहे. परंतु, तंत्रज्ञान नेहमी बदलत असते आणि नवे ॲप्स, गेम्स आणि नेटवर्क्स दररोज लोकप्रिय बनत चालले आहेत आणि पालक/काळजीवाहू म्हणून त्यांच्यावर नजर ठेवणे कठीण असू शकते. मुलांना आपल्यापेक्षा अधिक माहिती असण्याची शक्यता आहे आणि त्यांना सुरक्षित ठेवण्यासाठी काय करावे हे आपल्यासाठी आव्हानात्मक बनू शकते. जरी तंत्रज्ञानातील ही प्रगती आपल्याला नव्या अनुभवांची भरपूर संपत्ती देत असली तरी देखील, त्याचा अयोग्यरित्या वापर होण्याची संभावना असल्यामुळे आपल्याला देखील सतर्क राहणे गरजेचे आहे. काही अनुचित वापरामुळे आपल्या मुलांना लैंगिक हानी पोहोचण्याची शक्यता असते. हे असे होत असते:

अ. इंटरनेटवर नग्न, लैंगिक स्थितीमधील आणि/किंवा लैंगिक शोषण होत असतानाची मुलांची छायाचित्रे आणि व्हिडियो प्रतिमांकडे पाहून, घेऊन आणि/वितरीत करून - ज्याला बाल अश्लील वाङ्मय (चाईल्ड पोर्नोग्राफी) किंवा मुलांच्या लैंगिक शोषणाचे प्रतिमा चित्रण असे म्हणतात.

ब. इंटरनेटचा वापर करून प्रतिमा इतरांबरोबर शेअर करणे. काही लोक ज्यांना मुलांच्या लैंगिकतेमध्ये रुची असते त्यांना अतिशय अनुचित अशा प्रतिमा पाठवितात.

क. काही लोकांद्वारा ज्यांच्याशी लैंगिक शोषणाचा हेतू असेल अशा मुलांना आणि वयस्कांना या प्रतिमा पाठविल्या जाऊ शकतात आणि या क्रियेत समाविष्ट करण्याचा त्यांचा हेतू असू शकतो.

तथापि, ज्यांनी अशा मुलांवरील लैंगिक शोषणाची चित्रे पहिली आहेत ते प्रत्येक जण इतरांना पाठवीत बसत नाहीत किंवा प्रत्यक्ष कोणत्याही मुलावर लैंगिक शोषण करणार नाहीत. परंतु, बाल अश्लील वाङ्मयात अधिक रुळल्यास निरोगी प्रौढ नाते सांभाळण्याची एखाद्याची क्षमता ढासळू शकते आणि त्याचा एखाद्या मुलाशी लैंगिक संबंध साधण्याकडे कल वाढू शकतो.

मुलांना लैंगिक हानी पोहोचविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या इतर तंत्रज्ञानामध्ये आहेत:

अ. लैंगिक शोषण करण्यासाठी मुलांना 'वास्तविक जगात' भेटण्याच्या हेतूने मुलांशी ऑनलाइन संपर्क साधणे आणि 'मैत्री' करणे. याला ऑनलाईन तयार करणे किंवा ग्रूमिंग असे म्हटले जाते. अशा व्यवहारांना सुरु करण्यासाठी चाटरूम्स आणि नेट्वर्किंग साईट्स या सामान्य जागा आहेत. मुलांना त्यांची व्यक्तिगत तपशील देण्यासाठी, एखाद्या खाजगी चाटरूममध्ये जाण्यासाठी किंवा एखादा वेबकॅम वापरण्यासाठी प्रेरित केले जाऊ शकते.

ब. लैंगिक संभाषण करण्यासाठी मुलांना प्रोत्साहित करणे आणि त्यांच्यावर दबाव आणणे. याला काहीवेळा सायबरसेक्स असे म्हणतात.

क. मजकूर, ईमेल, एमएसएन किंवा सोशल नेट्वर्किंग साईट्सद्वारा लैंगिक अश्लील प्रतिमा पाठविणे. याला सेक्स्टिंग असे म्हणतात. उदा. यात एखादी तरुण व्यक्ती स्वतःला उघड करीत असतानाचे किंवा नग्न स्थितीत असलेले एखादे चित्र असू शकते.

मुले आणि युवा स्वतःला खालील स्वरूपात स्वतःला जोखमी आणि असुरक्षित स्थितीत नेऊ शकतात:

अ. इंटरनेट आणि मोबाईल फोनद्वारा बोलताना युवा वर्ग काहीसा बेसावध बनू शकतो आणि समोरासमोर बोलताना जसे बोलत असतील, त्यापेक्षा अधिक मोकळेपणाने काही गोष्टींविषयी बोलू शकतो.

ब. युवा वर्ग नेहमीच 'इंटरनेटवर सुरक्षित रहा' या सल्ल्याचे पालन नेहमी करेलच असे नाही. त्यांचे वय आणि विकास यांच्या स्वभावानुसार, ते धाडसी आणि धोके पत्करण्याची तयारी असणारे असू शकतात. वापरकर्ते सहसा त्यांनी ऑनलाईन संभाषण करताना इतर लोकांना काय सांगितले आहे हे सांगण्यास घाबरतात किंवा लज्जित असू शकतात आणि त्यांच्या पालकांनी, काळजीवाहू लोकांनी, त्यांच्या जीवनातील इतर महत्त्वाच्या प्रौढांनी आणि तसेच, त्यांच्या मित्रमंडळीने देखील शोधू नये असे त्यांना वाटत असते. तसेच, जर ते ऑनलाईन ग्रूमिंग किंवा बाल अश्लील साहित्याचा बळी पडले असल्यास, जे काही घडले त्याबद्दल त्यांच्यात नेहमी लज्जेची, जबाबदारी आणि अपराधीपणाची भावना असते, ज्यामुळे त्याविषयी कोणालाही सांगणे त्यांच्यासाठी कठीण होऊन जाते.

आपल्या मुलांना हे स्पष्टपणे सांगून ठेवणे महत्त्वाचे आहे की जरी त्यांनी काही चुकीचे केले तरी ते सांगण्यास हरकत नाही.

सर्व प्रौढांनी ऑनलाईन संबंधांपासून मुले आणि युवा वर्गासाठी असलेल्या या संभाव्य धोक्याबाबत सावध राहणे महत्त्वाचे आहे आणि कोणत्याही हानीपासून त्यांचे रक्षण करण्यास समर्थ राहिले पाहिजे. याचा अर्थ तंत्रज्ञानाचा कसा दुरुपयोग केला जाऊ शकतो आणि कोणती गोष्ट मुलांना असुरक्षित बनविते हे जाणून घेणे हे आहे.

प्रश्न ii

## मुलांचे ग्रूमिंग ऑनलाईन कशा रीतीने वेगळ्या प्रकारचे असते?

अनेक परिस्थितींमध्ये, ऑनलाईन ग्रूमिंग अतिशय वेगाने होते आणि निनावी असते आणि परिणामी मुले सहसा नेहमी समोरासमोर भेटत असलेल्या लोकांपेक्षा त्या ऑनलाइन 'मित्रावर' पटकन विश्वास ठेवू लागतात. मुलांना लैंगिक हानी पोहोचविण्याचा प्रयत्न करणारे लोक स्वतःची खरी ओळख, वय आणि लिंग लपवून ठेवून त्यांच्याविषयी सहजपणे माहिती काढून घेऊ शकतात. जे लोक मुलांना ऑनलाईन तयार करतात, त्यांच्यासाठी वेळेचे किंवा एखाद्या मुलाविषयी माहिती प्राप्त करण्यासाठी बंधन नसते कारण ते 'वास्तविक जगात' असतात.

प्रश्न iii

## ऑनलाईन घडत असलेल्या अशा समस्यांना कसे ओळखावे?

अशी काही सूचके आहेत, जी आपल्याला मुले ऑनलाईन समस्यांचा सामना करत आहेत काय ते ओळखण्यास मदत करू शकतील:

अ) इंटरनेटवर भरपूर वेळ घालविणे, विशेषतः गुप्तपणे एखाद्या नव्या ऑनलाईन मित्राशी बोलणे;

ब) अत्याधिक गुप्तता राखण्याचा प्रयत्न करत असणे- विशेष करून तंत्रज्ञानाच्या वापराच्या भोवती;

क) दरवाजा बंद करणे आणि कोणीही खोलीत येताना पाहून स्क्रीनवरील विषय लपविण्याचा प्रयत्न करणे;

ड) ते करत असलेल्या ऑनलाईन बाबींविषयी खुलेपणाने बोलण्यास आढेवेढे घेणे;

ई) मोबाईलवर उत्तरे देतांना चिडचिड करणे आणि कॉल एकांतात घेण्याची सवय असणे;

फ) कोठे जात आहोत याचे स्पष्टीकरण न देता कुटुंबापासून बराच वेळ दूर राहण्याची सवय लागणे;

ग) एखाद्या नव्या मित्राबद्दल मोघम बोलणे, पण त्याच्याविषयी आणखी माहिती न सांगणे.

वर उल्लेखित चिन्हे आणि लक्षणे वास्तवात ऑनलाईन लैंगिक शोषण घडलेले असेलच हे दर्शवित नाहीत. ती केवळ सूचके आहेत. ही चिन्हे आणि लक्षणे ऑनलाईन आणि ऑफलाईन मार्गे ते मूल अन्य आव्हानांचा सामना करत असल्याचे देखील दर्शवू शकते.

प्रश्न iv

## तंत्रज्ञान वापरताना आपण आपल्या मुलांना सुरक्षित कसे ठेवू शकतो?

मुले आणि युवा वर्ग लहान वयापासूनच घरी आणि शाळांमध्ये कम्प्युटर्सचा वापर करीत असतात. काही जणांच्या बाबतीत, ते कसे काम करते याविषयी त्यांचे ज्ञान आणि समज त्यांचे पालक आणि काळजीवाहूंपेक्षा अधिक असते. यामुळे काहीवेळा आपल्या मुलांच्या तंत्रज्ञानाच्या सुरक्षित वापरावर कसे लक्ष ठेवावे याबाबत आपणास खात्री नसते.

जेव्हा आपली मुले लहान असतात, तेव्हापासूनच आपण त्यांच्या उद्योगांवर नियंत्रण ठेवले पाहिजे. परंतु, जसे ते किशोरवयात पोहोचतात, तेव्हा त्यांना खाजगीपणा आणि स्वातंत्र्याची गरज असते आणि त्यामुळे नियंत्रणावर मर्यादा येतात. वाढत्या मुलांना आपल्याला काळजी देणाऱ्या जोखमांना कमी करत स्वातंत्र्य देणे आपल्यासाठी आव्हानात्मक ठरू शकते. त्यामुळे आपल्या मुलांना हानीपासून सुरक्षित ठेवण्यासाठी आणि त्यांना सकारात्मकपणे आणि जबाबदारीने तंत्रज्ञान वापरण्यास सक्षम बनविण्यासाठी, तंत्रज्ञानाबद्दल आपल्याला पुरेशी माहिती असणे महत्त्वाचे असते. मुलांना सक्षम करणे गरजेचे असते, जेणेकरून ते ऑनलाईन जोखमांबद्दल सावध राहतील आणि असुरक्षित संपर्कांना ओळखू शकतील. उदा. मुलांशी खुलेपणाने बोलणे आणि एक सुरक्षित असे इंटरनेट वापराचे चेकलिस्ट बनविण्यासाठी मदत करणे आणि त्याला वापरण्यासाठी प्रोत्साहित करणे.

8



# अपंगत्वासह जगणारी मुले

प्रश्न i

## अपंगत्व असणाऱ्या मुलांसाठी मुलांवरील लैंगिक शोषणाचा अर्थ काय आहे?

जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) हिंसा आणि इजा प्रतिबंध आणि अपंगत्व, २०१२ च्या विभागाद्वारा केल्या गेलेल्या एक समीक्षेच्या अनुसार अपंगत्व असणाऱ्या मुलांना सामान्य मुलांपेक्षा लैंगिक शोषणाचा धोका सुमारे तीनपटीपेक्षा अधिक असतो.

या वाढीव जोखमात योगदान देणारा सर्वात मोठा घटक म्हणजे सर्वसाधारणपणे मुलांना आणि विशेष करून अपंगत्व असणाऱ्या मुलांना लैंगिक शिक्षण देण्याबाबत निष्काळजीपणा. मुलांना लैंगिक शोषणाच्या मोठ्या जोखमात असणाऱ्या अतिरिक्त घटकांमध्ये स्वास्थ्य, त्यांच्यासाठी आणि त्यांच्या काळजीवाहुंसाठी सामाजिक आधाराची कमी, मुलाच्या लैंगिक वागणुकीविषयी गैरसमज आणि एकंदर कलंक आणि भेदभाव यांच्यासारख्या दैनंदिन जीवनातील घटकांसाठी सहाय्य इ. आहेत.

खास करून, बौद्धिक आणि विकासाची क्षमता

नसलेली मुले देखील अधिक असुरक्षित असू शकतात, कारण अपंगत्वामुळे त्यांच्यामधील सामाजिक कौशल्ये, निर्णय घेण्याची क्षमता आणि एकंदर निर्णयशक्ति प्रभावित होऊ शकते. स्वतंत्र (वैयक्तिक) निगेची परिस्थिती, संभाषणातील अडथळे आणि मनो-लैंगिक विकासाविषयी माहितीची उणीव यांच्यामुळे संस्थांमध्ये राहणाऱ्या अपंगत्व असणाऱ्या मुलांमध्ये देखील शोषणाचा वाढीव धोका असतो. या सर्व परिस्थितींमध्ये, संवाद साधण्याच्या क्षमतेतील उणीव एका मुलाला उघड करण्याच्या किंवा मदतीसाठी बोलावण्याच्या क्षमतेवर परिणाम करते.

प्रश्न ii

## अपंगत्व असलेल्या मुलाला वैयक्तिक सुरक्षा शिक्षणाविषयी शिकविण्याची गरज आहे काय?

विकासाच्या पातळीकडे लक्ष न देता निरोगी नातेसंबंधाविषयी शिक्षण  दिले जाऊ शकते, ज्यात लैंगिकतेचे शिक्षण आणि वैयक्तिक सुरक्षा शिक्षण सामील असेल.

याच्यामुळे लैंगिक शोषणाची जोखम कमी होऊ शकते. योग्य तऱ्हेने या संकल्पना शिकविल्याने त्या मुलाला स्वतःच्या संरक्षणासाठी आवश्यक कौशल्यांचा विकास करण्यास मदत मिळू शकेल, अशा वर्तनामध्ये गुंतले जाण्याची संभावना घटेल आणि तसेच, इतरांसाठी संभाव्य हानिकारक किंवा गुन्हेगारी असतील अशा वर्तणुकीत गुंतले जाण्याची संभावना देखील घटते. तथापि ही सर्वात महत्वाची गोष्ट जाणून घ्यावी की अधिकांश अपंग मुले स्वतःचे रक्षण कदाचित करू शकणार नाहीत, मग त्यांच्यासाठी अनुचित वागणुकीस कळविण्यासाठी सक्षम बनविणे महत्वाचे ठरेल.

प्रश्न iii

## मर्यादित स्वरूपात संवाद करू शकणाऱ्या मुलाला वैयक्तिक सुरक्षा शिक्षणाविषयी माहिती देण्याचा सर्वोत्तम मार्ग कोणता आहे?

अपंगत्व असणारी मुले संवादासाठी भाषेच्या विविध प्रकारांचा वापर करतात. त्यात बोलणे, चिन्हे आणि पर्यायी किंवा संवादाच्या गुरुत्ववाचक स्वरुपांचा (ध्वनीची उपकरणे, टायपिंग, हावभाव, चित्रे आदी) समावेश असतो. शरीराचे विविध भाग दाखविण्यासाठी हावभावांसहित संवादाच्या पद्धतींचे एकत्रीकरण मुलांना शिकविले जाऊ शकते. जी मुले मर्यादित स्वरूपात संवाद व्यक्त करू शकतात, अशांसाठी या युक्ती उपयुक्त ठरू शकतात.

पालकांनी आणि त्या मुलाच्या शिक्षकांनी स्वतःसाठी आणि त्या मुलासह एकमेकांशी आणि त्या मुलासह दैनंदिन जीवनाच्या शौचाच्या आणि इतर कार्यामध्ये आवश्यक गरजेच्या उचित पातळीविषयी मुलभूत सुरक्षा नियमांची समीक्षा केली पाहिजे. जर शरीराच्या भागांसाठी शब्द आणि हावभाव यांची आणि तसेच कितपत मदतीची आवश्यकता आहे याची समीक्षा केली तर, ज्या मुलाकडे बोधात्मक अपंगत्वासह मर्यादित स्वरूपात संवाद आहेत, तो सूचित करू शकतो किंवा केव्हा अनुचित स्पर्श झाला होता हे "सांगू" शकतो. त्या मुलाच्या वैयक्तिक शिक्षण योजनेत किमान एक सुरक्षा ध्येय असावे.

# 9



# सीएसएसोबत कार्य करणे: जागरुकता निर्माण करणे आणि प्रतिबंधाच्या दिशेत काम करणे

प्रश्न i

## सभोवताली CSA च्या बाबतीत बोलण्यास अस्वस्थता आहे, अशावेळी तुम्ही जागृती आणण्याचा कसा विचार कराल?

शिक्षण महत्त्वाचे आहे आणि विकासाच्या दृष्टीने लहान पायर्यांमध्ये केले पाहिजे. मुलाभोवती सुरक्षा आणि आधाराचे जाळे विणण्यासाठी मदत करण्यासाठी पालक आणि शिक्षक आणि इतर संबंधित भागधारकांमध्ये आवश्यक अशा ज्ञानाचा, प्रवृतीचा आणि कौशल्यांचा विकास करण्यासाठी, त्यांना संवेदनशील बनविण्यासाठी आणि आधार देण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. या भागधारकांना हे समजण्यासाठी संबोधित केले जाते की मुलांना सुरक्षित ठेवण्यात प्रत्येक व्यक्तीची भूमिका असते. उदा. पालकांना हे सांगितले जाते की शरीराचे खाजगी भाग आणि सुरक्षा आणि असुरक्षित स्पर्श यांच्या बाबत मुलांसह संवादाचे द्वार खुले केल्यास मुलांना

सुरक्षित ठेवण्यात ते कशा रीतीने महत्त्वाची भूमिका बजावतात.

हात, पाय आणि चेहरा यांच्यासारख्या शरीराच्या इतर भागांची ओळख करून देताना शरीराच्या खाजगी भागांची नावे देखील मुलाला शिकविणे यांच्यासारखी सोपी पावले अत्यंत उपयुक्त ठरू शकतात. याद्वारा शरीराच्या खाजगी भागांच्या संदर्भात वस्तुस्थिती प्रवृत्ती निर्माण होते आणि जर मुलांवर लैंगिक शोषण झाले तर त्यांच्याविषयी बोलण्यात सुलभता आणि सुविधा निर्माण होते.

त्याच प्रकारे, मुलांना स्पर्शाचे नियम आणि सुरक्षा पावले समजवा:

शरीराच्या खाजगी अवयवांना स्वच्छ आणि निरोगी ठेवण्यासाठी तुमच्याशिवाय कोणत्याही इतर व्यक्तीने स्पर्श करावा, त्याच्याकडे पहावे किंवा त्याच्याविषयी बोलणे कधीही उचित नसते. त्याच प्रमाणे, अन्य कोणीही त्याच्या शरीराच्या खाजगी अवयवांना स्पर्श करण्यास, पाहण्यास किंवा त्यांच्याविषयी बोलण्यास तुम्हाला सांगणे देखील उचित नसते. हा स्पर्शाचा नियम कोणीही तोडला तर सुरक्षेची 3 पावले आहेत, ती म्हणजे 'नाही' म्हणा, पळा आणि तुम्हाला हवी असलेली मदत घेण्यासाठी तुम्ही विश्वास करत असलेल्या एखाद्या व्यक्तीस सांगा.

या साध्या, वयोचित नियमांच्या आधारावर या बाबींविषयी बोलून आणि जर मुलांनी त्यांना स्पर्शाची समस्या होती असे सांगितले, तर त्याला कशा रीतीने प्रतिसाद द्यावा हे पालकांना शिकवून, जागरुकता आणत, अखेरीस बदल घडवून आणण्याचा आपला हेतू अर्पण साध्य करीत आहे.

**प्रश्न ii**

## वाढते आकडे असताना देखील, मुलांवरील लैंगिक शोषण प्रतिबंधाचा कार्यक्रम सीमित स्वरूपात का आहे?

आपल्या विस्तारामध्ये हे कार्यक्रम सीमित आहेत, कारण यातील संस्था सीमित आहेत आणि यासाठी काम करणारी साधनसामग्री सीमित स्वरुपात आहे. त्याच वेळी, सीएसएच्या बाबीविषयी संवेदनशीलता आणि जागरूकतेची कमी आणि या बाबत असलेली स्तब्धता असताना देखील, शाळा वैयक्तिक सुरक्षा कौशल्यांच्या संबंधात "जीवन कौशल्यां"साठी खुल्या नाहीत. दुसरे महत्त्वाचे आव्हान हे आहे की सर्व पालक या कार्यक्रमाचे समर्थक नाही, कारण त्यांना असे वाटते की मुलांना त्यांच्या शरीराच्या खाजगी अवयवांविषयी आणि वैयक्तिक सुरक्षेविषयी कोणतीही माहिती दिल्यास त्यांच्यातील निरागसता निघून जाऊ शकेल. इतर पालकांना असे वाटते की या बाबी केवळ पालकच त्यांना शिकवू शकतील; तरी देखील बहुतेक पालकांना लज्जित वाटते किंवा त्यांना त्यांच्या मुलांना गुप्तांग आणि लैंगिकतेबद्दल सुरक्षा यांच्याविषयी कसे सांगावे हे कळत नाही.

नोंद घ्या: वैयक्तिक सुरक्षा शिक्षण कार्यक्रमांबद्दल अधिक माहितीसाठी कृपया वैयक्तिक सुरक्षा शिक्षणावरील या खंडाचा संदर्भ घ्या. तसेच, तुम्हाला अर्पणचे वैयक्तिक सुरक्षा कार्यपुस्तिका आणि माय लिटल बॉडी बुकमध्ये आणखी माहिती मिळू शकते. कृपया आमची वेबसाईट www.arpan.org.in वर आणि या दस्तावेजाच्या अखेरीस उल्लेखित इतर साधनसामग्रीस भेट द्या.

# 10




# वैयक्तिक सुरक्षा शिक्षणाबद्दल माहिती

**प्रश्न i**

## वैयक्तिक सुरक्षा शिक्षण काय आहे? ही माहिती कोण देऊ शकतो?

वैयक्तिक सुरक्षा शिक्षण मुलांना शिकविण्यावर भर देते की ते विशेष असतात आणि त्यांचे शरीर अद्भुत असते. वैयक्तिक सुरक्षा मुलांना जाणीव होण्याविषयी आणि सुरक्षित राहण्याविषयी (जसे आपल्या शरीराच्या खाजगी भागांना जाणून घेणे आणि कोणाकडून आपल्याला खरी मदत मिळू शकेल हे माहिती असणे), त्या माहितीला हाताळण्याचे कौशल्य (जसे आग्रहीपणा) आणि शेवटी या माहितीवर आधारित कौशल्यांना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी आत्मविश्वासाच्या जाणीवेसाठी आत्मसन्मान निर्माण करणे. सुरक्षिततेची जाणीव असण्याचा आणि सुरक्षित राहण्याचा आपल्या सर्वांना हक्क आहे. अत्यंत साध्या शब्दात, वैयक्तिक सुरक्षा स्पर्शाच्या नियम आणि त्या नियमाला पाळण्याच्या सुरक्षा पावलांवर बनलेले आहे.

शरीराच्या खाजगी अवयवांना स्वच्छ आणि निरोगी ठेवण्यासाठी तुमच्याशिवाय कोणत्याही इतर व्यक्तीने स्पर्श करावा, त्याच्याकडे पहावे किंवा त्याच्याविषयी बोलणे कधीही उचित नसते. त्याच प्रमाणे, तुम्ही एखाद्याच्या शरीराच्या खाजगी अवयवांना स्पर्श करणे, पाहणे किंवा त्यांच्याविषयी बोलणे हे देखील उचित नसते. जर हे घडले किंवा तुम्हाला भीती वाटली, तर पुढील पावले आहेत, 'नाही' म्हणा, निघून जा आणि शक्य तितक्या लवकर एखाद्या विश्वसनीय प्रौढ व्यक्तीस सांगा.

एक पालक म्हणून, तुमच्या मुलांच्या व्यक्तिगत सुरक्षेतील तुमचा भाग म्हणजे परिसराविषयी जागरूक राहणे, मुलांचे कसे ऐकून घ्यावयाचे हे समजून घेणे, आणि जर तुमच्या मुलाला असुरक्षित वाटत असेल तर त्याला प्रतिसाद कसा द्यावा.

वैयक्तिक सुरक्षा शिक्षणामध्ये मुल्ये, प्रवृत्ती आणि स्वतःला सुरक्षित ठेवण्याविषयी मुलांचे हक्क यांच्याविषयी संवाद चालू राहणे गरजेचे असते. पालक/काळजीवाहू मुलांचे सर्वोत्कृष्ट शिक्षक आणि सोबती असतात आणि मुलांना वैयक्तिक सुरक्षा शिक्षण देण्यासाठी सर्वात योग्य असतात. परंतु, जर पालकांना हे शिकविण्यास गैरसोईचे वाटत असेल आणि शिक्षक बऱ्याच मुलांना शिकवत असल्यामुळे शाळा देखील व्यक्तिगत सुरक्षा शिक्षण कार्यक्रम मुलांना शिकविण्यास हाती घेऊ शकतात. अर्पण शाळांमध्ये वैयक्तिक सुरक्षा शिक्षण आयोजित करतात तसेच, शिक्षकांना/समुपदेशकांना त्यांच्या "जीवन कौशल्ये" कार्यक्रमात या मॉड्यूलला समाविष्ट करण्यास प्रशिक्षित करतात.

**प्रश्न ii**

## वैयक्तिक सुरक्षा शिक्षणामध्ये वयोचित आशय असणे का महत्त्वाचे असते?

आपण सर्व लोक आपला दृष्टीकोन आणि समजण्याची क्षमता यांच्यानुसार शिकत असतो, जे आपल्या वयावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असते. आम्ही मुलांच्या सर्वसाधारण मनो-लैंगिक विकासाच्या टप्प्यांविषयी तुमच्यासाठी खाली रूपरेखा देत आहोत:

अ) जन्म ते २ वर्षे: मुलांना आपल्या शरीराविषयी अतिशय लहान वयापासूनच कुतूहल असते. अगदी लहान बाळे, म्हणजेच तीन ते पाच महिने वयाची बाळे देखील त्यांच्या खाजगी अवयवांना स्पर्श करीत असतात. हे सामान्य आणि नैसर्गिक आहे कारण हा स्पर्श मुलांना आरामदायी वाटतो. मुले प्रौढांप्रमाणे याचा अर्थ काढत नाहीत किंवा लैंगिक सुख मिळवीत नाहीत. परंतु, जर मुलाला शरीराच्या खाजगी अवयवांना स्पर्श करण्याची अत्याधिक सवय लागली आणि इतर कार्यांच्या सोबत त्यात संतुलन राहिले नाही, मग त्यात लक्ष घालणे अतिशय आवश्यक बनते. वयाच्या सुमारे दुसऱ्या वर्षी मुलांमध्ये पुरुष किंवा स्त्रीलिंगी भागांचा विकास होऊ लागतो. ही समज शरीराच्या खाजगी भागांमधील फरक ओळखण्याबरोबर सुरु होते, पण मूल मोठे होते तसे याच्या पलीकडे जाते.

ब) २-५ वर्षांचे मुलं: या वयाच्या टप्प्यावर मुलं एकमेकांच्या शरीराविषयी जाणण्यास उत्सुक असतात. ते त्यांचा स्वत: च्या शरीराचा शोध देखील घेत असतात आणि या मुलांना नग्न राहणे देखील आवडू शकते. या वयामधली मुलं फार कमी संकोच दाखवतात. जोपर्यंत मुलं स्वतः मग्न राहत नाही, इतर मुलांना बळजबरीने स्पर्श करीत नाही किंवा त्यांचे वयापलीकडील लैंगिक ज्ञान / वागणूक प्रदर्शित करीत नाही तोपर्यंत मनो-लैंगिक विकासाचा भाग म्हणून हे आचरण सामान्य आहे . आई-वडील / काळजी घेणाऱ्यांनी आश्चर्य, राग व्यक्त न करता किंवा मुलांना न लाजवता / त्यांना पेचामध्ये न टाकता योग्य प्रतिसाद दिला पाहिजे.

क) ६-१० वर्षांच्या दरम्यान, मुलांना मुलगा आणि मुलगी यांच्यातील जैविक दृष्ट्या आणि सामाजिक दृष्ट्या भिन्नता समजते. मुलं त्यांच्या शरीराबद्दल संकोच आणि लाजाळू बनतात,

ते यानंतर नग्न होऊन धावत नाही किंवा इतरांना आंघोळ करतांना पाहू देत नाही. या टप्प्याच्या शेवटी, मुले आणि मुली दोन्ही

लवकरच होणार्या लैंगिक विकासाची चिन्हे दर्शवू शकतात. अशावेळी जर मुलांना पर्याप्त माहिती दिली गेली नाही तर त्यांना जैविक बदल हाताळण्यात संकोच वाटू शकतो/किंवा असे बदल हाताळण्यात ते अक्षम होतात आणि विविध स्रोतांपासून प्राप्त अधिकाधिक आणि अनेकदा परस्परविरोधी संदेशामुळे ते गोंधळून जाऊ शकतात. या टप्प्यावर मुलं खाजगी अवयवांबद्दल समज विकसित करतात आणि ते सार्वजनिक ठिकाणी योग्य वर्तन कसे असावे याबाबत संकेतावरून शिकतात . काही मुले वयाच्या 8 व्या किंवा 9 व्या वर्षी वयात येऊ शकतात.

ख) साधारणपणे ११-१८ वर्षाच्या वयात मुलं वयात येतात आणि त्यांचे मनो-लैंगिक विकास जाणवते. तारुण्य ही बालपण आणि प्रौढत्व दरम्यान अशी वेळ आहे कि जेव्हा मुली व मुले शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या प्रौढ होतात. या टप्प्यात एक मुलगी स्त्री होत असते आणि एक मुलगा एक पुरुष होत असतो. तारुण्य सुरू होते जेंव्हा एक मुलगा किंवा मुलीचे शरीर तयार होते आणि प्रत्येकजण त्याच्या किंवा तिच्या स्वत: च्या वेगाने वाढतो/वाढते. साधारणपणे, मुली मुलांपेक्षा लवकर वयात येतात. मुलींचे तारुण्यात पदार्पण करण्याचे सरासरी वय १२ वर्ष आहे. पण त्या ८ ते १६ वर्षाच्या दरम्यान कधीही वयात येऊ शकतात. मुलांमध्ये ९ ते १४ वर्ष वयोगटात तारुण्याची सुरूवात होते. तारुण्याची सुरुवात चेहर्यावर केस येणे, मुलांच्या शरीरावर केस येणे, मुलींच्या छातीचा भाग वाढणे, स्त्री आणि पुरुष गुप्तांगांवर केस येणे अशा सारखे दुय्यम लैंगिक परिवर्तनाने दिसते. या टप्प्यात मुलींना मासिक पाळी सुरु होते आणि मुलांच्या आवाजामध्ये बदल होतो. मुलांना देखील रात्रीचे वीर्यपतन ज्याला अधिक सामान्यपणे स्वप्नदोष म्हणून ओळखले जाते ते होण्याची अधिक शक्यता असते. आधीच उल्लेख केल्या प्रमाणे अशावेळी पर्याप्त माहिती आणि मार्गदर्शन पुरवले न गेल्यास मुलांना त्यांच्या शरीरात होणाऱ्या बदलांबद्दल संभ्रम निर्माण होतो आणि त्यांच्यासाठी अशा शारीरिक आणि भावनिक बदलांना सामोरे जाणे हे मोठे आव्हान असते. जर बालपणापासून मुलांसोबत योग्य संवाद साधला नाही तर आई-वडील/ काळजी घेणारे यांच्यासाठी या विषयांवर मुलांसोबत बोलणे आव्हानात्मक बनू शकते. अशा परिस्थितीत पालकांना आपल्या पाल्याचे प्रश्न, शंका आणि प्रश्नांना सामोरे जाण्यासाठी व्यावसायिक मदत घ्यावी लागू शकते.

**प्रश्न iii**

## पालक काय करू शकतात?

अ) १८ महिने - ३ वर्षाची मुलं: जेंव्हा आपण मुलांना शरीराच्या अवयवांची ओळख करून देतो जसे हात, पाय तेंव्हाच शरीराच्या सर्व खाजगी अवयवांची योग्य नावे देखील शिकवा (उदा, मुलांना पुरुषाचे जननेंद्रिय, अंडकोष, नितंब आणि गुद्द्वार बद्दलचे शब्द शिकवा; मुलींना देखील योनी, छाती, नितंब, गुदद्वार असे शब्द शिकवा).

ब) ३-५ वर्षे: आपल्या मुलांना शरीरालगतच्या पोशाखाने/स्विमिंग सूट ने झाकलेल्या अवयवांना खाजगी

अवयव म्हणतात हे शिकवा. मुलांना त्यांच्या खाजगी अवयवांना सुरक्षित ठेवण्याबद्दल नियम शिकवा:

नियम १: त्यांना स्वच्छ आणि निरोगी ठेवणे वगळता कोणालाही माझ्या खाजगी अवयवाला स्पर्श करणे, पाहणे किंवा त्याबद्दल बोलणे योग्य नाही. तसेच, कोणीही मला त्याच्या खाजगी अवयवाला स्पर्श करायला लावणे, पाहयला लावणे किंवा बोलायला लावणे ठीक नाही.

नियम २: जर कोणी हा नियम खंडित करण्याचा प्रयत्न केल्यास, मी म्हणेन “नाही”, चालता हो / चल दूर हो. या नियमाने मुलांमध्ये त्यांच्या भावनेबद्दल जागरूकता तयार होईल आणि भावनेच्या माध्यमातून त्यांना सुरक्षित आणि असुरक्षित परिस्थिती ओळखण्यास मदत होईल.

मुलाच्या सभोवती एक आधार प्रणाली तयार करणे देखील महत्वाचे आहे जेणेकरून मूल प्रौढ व्यक्तीकडे पोहोचून त्यांची मदत घेऊ शकतील.

नियम ३: कोणाला तरी सांगा आणि मदत मिळेपर्यंत सांगतच राहा.

क) ५-८ वर्षे: आपण आधीपासून चालू केलेले वैयक्तिक सुरक्षा संवाद सुरू ठेवा. घरी आणि बाहेर अशा सुरक्षित आणि असुरक्षित दोन्ही परिस्थितींची भरपूर उदाहरणे द्या. त्यांना एक विशिष्ट परिस्थिती समजून आणि योग्य ती कारवाई करण्यासाठी मुलांना 'तर काय' खेळ खेळा. (उदाहरणार्थ, एखादा मनुष्य मिठाई विकतो आणि तो आपल्याला कुठेतरी यायला सांगत आहे तेही कुणालाही न सांगता गुपचुपपणे, अशावेळी, आपण काय करायचे?) मुलांना परिचित व्यक्ती बद्दल देखील असुरक्षित परिस्थिती निर्माण होत आहे का ते तपासा. घरापासून दूर असताना शिक्षक किंवा इतर जवळच्या व्यक्तींचा आधार यंत्रणेमध्ये समावेश करून यंत्रणा विस्तारा.

ड) ८-१२ वर्षे: वैयक्तिक सुरक्षेचा संदेश पुन:पन्हा उच्चारत रहा. वैयक्तिक सुरक्षितता "नियमा" ऐवजी "मार्गदर्शक तत्वांबद्दल" बोला. मुलांनी " काय करावे" आणि "काय करू नये" याबद्दल आदेश देण्यापेक्षा त्यांना योग्य गोष्ट पटवून देणे गरजेचे आहे. त्यांच्या संदर्भामधील संबंधित उदाहरणे व स्थिती तयार करा. त्यांच्या समवयाच्या मुलाकडून स्पर्श, दमदाटी आणि स्वत:चा शोध घेणे संबंधित शंकांबद्दल संवाद साधत रहा.

इ) १२-१८ वर्षे: मुलांच्या वैयक्तिक सीमा , लैंगिक संशोधन आणि सुरक्षितता संबंधित त्यांचे प्रश्न आणि शंकाचे उत्तर देण्यासाठी आपल्या मुलांशी सुरू केलेले संवाद आणि संप्रेषण माध्यमे वाढवत रहा. तारुण्याच्या उंबरठ्यावर होणाऱ्या भावनिक आणि शारीरिक बदलांसाठी मुलाला मानसिकदृष्ट्या तयार करा. मुलांच्या भावना समजून घ्या आणि त्यांना स्विकारा. समवयातील मुलांचे दडपण हाताळण्यासाठी आणि त्यांची स्वत:ची ओळख शोधण्यासाठी त्यांना आधार द्या. मुलांना सतत सांगण्याऐवजी ते काय म्हणत आहे ते ऐका.

प्रश्न iv

## शरीराच्या खाजगी अवयवांची नावे शिकवणे का महत्वाचे आहे?

आपण अनेकदा मुलांना शरीराच्या खाजगी अवयवांची वैद्यकीय नावे शिकवत नाही. शरीराच्या खाजगी अवयवांचे वर्णन करण्यासाठी कुटुंबांनी विविध नावे वापरणे सामान्य आहे. अनेकदा कुटुंबियांना मुलं शरीराच्या अवयवाबद्दल बोलताना आढळल्यास त्यांना ते शिक्षा करतात. याचे अनेक नकारात्मक प्रभाव आहेत: १) यामुळे आपले खाजगी अवयव लाजेचा विषय बनतात ; २) मुलांना खाजगी अवयवाबद्दल समस्या असल्यास ते मदत मागू शकत नाहीत ; आणि ३) मूल त्याला काय झाले आहे हे सांगू शकत नसल्यामुळे त्याचे पालक त्याची समस्या समजू शकत नाहीत.

उदाहरणार्थ, एक आई आपल्या मुलीला शिकविते कि तिने कोणालाही तिच्या फूलाला स्पर्श करू देऊ नये. मुलगी आणि आई दोघींना माहित आहे कि त्यांच्या खाजगी अवयवाला फूल असे म्हणतात. पण एके दिवशी जेव्हा नेहमीप्रमाणेच आई कामामध्ये खूप व्यस्त होती तेव्हा मुलगी पळत येते आणि तिला सांगते कि कोणीतरी तिच्या फुलाला दुखापत केली. कामात व्यस्त असणाऱ्या आईला फक्त फूल हा शब्द ऐकू येतो व त्यामुळे ती मुलीला सांगते कि जा आणि दुसरे एक फूल तोडून आण. जर मुलीने फुलाऐवजी योनी किंवा खाजगी अवयवाचे नाव वापरले असते तर, आईने सर्व कामे सोडून आपल्या मुलीचे म्हणणे ऐकले असते आणि तिच्या मुलीची मदत केली असती.

प्रश्न v

## सीबीएसई / आयसीएसई अभ्यासक्रमातील विज्ञान विषयाच्या पाठांमध्ये शरीराच्या खाजगी अवयवांबद्दल विस्तृत माहिती देण्यात आली आहे. तरी देखील आपल्या मुलांना वैयक्तिक सुरक्षा शिक्षण (PSE) कार्यक्रम करणे का आवश्यक आहे?

विज्ञानाचे धडे फक्त जैविक माहिती देण्यासाठी असतात आणि फक्त मोठ्या वर्गांच्या मुलांना शिकवले जातात. पीएसई कार्यक्रमात कौशल्य शिकवले जाते, आपले संरक्षण करण्यासाठी आवश्यक आत्मसन्मान निर्माण केले जाते , आणि एक आधार प्रणाली विकसित केली जाते. पीएसई तीन वर्षाच्या मुलांना देखिल शिकवले जाऊ शकते आणि मोठे विद्यार्थी शाळेत ज्या गुंतागुंतीच्या मार्गाने विज्ञान शिकतात ते येथे समाविष्ट करण्याची गरज नाही. पीएसई कार्यक्रम एक "जीवन कौशल्य" मॉड्यूल आहे जे वयाला साजेलशी पुरेशी  माहितीच पुरवित नाही तर एका अर्थाने समानुभूती, स्वाभिमान आणि शरीरावर मालकी सारखे गुण बिंबविते. महत्त्वाचे म्हणजे, पीएसई मॉड्यूलच्या शिक्षण प्रक्रियेमध्ये मुलाच्या पालकांचा समावेश असतो. PSE पाठांच्या दरम्यान, मुलांना अभ्यास दिला जातो आणि त्यामध्ये पालकांना त्यामध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. अभ्यास अशा प्रकारे दिला जातो कि मुलांना त्यांचे प्रश्न, शंका, संभ्रम आणि विचार मांडायला वाव मिळतो आणि आवश्यक तेव्हा मुलांना मदत मागण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. मुले आणि पालक यांच्यामधील सुसंवाद त्यांना एकमेकांबरोबर गैरसोयीच्या वाटणाऱ्या समस्येबाबत बोलण्यास एक माध्यम प्रदान करते.

प्रश्न vi

## जेव्हा मुलांना वैयक्तिक सुरक्षा बद्दल शिकवले जाते त्यानंतर ते सुरक्षित स्पर्शाचा देखील प्रतिकार करतील का?

वैयक्तिक सुरक्षेच्या शिक्षणामध्ये, सुरक्षित स्पर्श तसेच असुरक्षित स्पर्शांची अनेक उदाहरणे दिली जातात त्यामुळे ते दोन्ही प्रकारच्या स्पर्शामध्ये फरक करू शकतात. सुरक्षित स्पर्श निरोगी असतात आणि ते मुलांना केवळ हवेच नसतात तर त्यांची गरज पण असते. मुलांना स्पर्शाबद्दल शिकविल्यास ते नवीन शिकलेल्या शब्दसंग्रहाचा भरपूर वापर करू शकतात आणि काही घटनांमध्ये गैरसमज करून घेऊ शकतात. पण पालक / काळजी घेणाऱ्यांनी मुलांसोबत धीर धरायला पाहिजे आणि त्यांच्याशी संभाषण सुरु करण्यासाठी या संधीचा वापर करायला पाहिजे. काही काळानंतर ही चिंता कमी होईल. वैयक्तिक सुरक्षा शिक्षण कार्यक्रमाचे शिक्षक / प्रशिक्षकांनी या मुलांशी बोलायाला पाहिजे आणि त्यांना सांगायला पाहिजे कि त्यांना सर्व प्रकारच्या स्पर्शाची भीती वाटू नये आणि त्यांना धैर्य द्या कि त्यांच्याकडे कोणत्याही परिस्थितीचा सामना करण्यासाठी आवश्यक सर्व ज्ञान आणि कौशल्य आहे.

प्रश्न vii

## वैयक्तिक सुरक्षा शिक्षण वर्गात देण्यात येणारी माहिती वेगवेगळया आकलन शक्तीचे विद्यार्थी कसे समजू शकतील?

वैयक्तिक सुरक्षा शिक्षण वेगवेगळ्या पध्दती वापरून दिले जाते आणि प्रामुख्याने एक व्याख्यान आधारित मॉड्यूल नाही आहे. प्रत्येक मॉड्यूल वयानुरूप आणि विकासाच्या वेगवेगळ्या पातळीवर  डिझाइन केले असते. वैयक्तिक

सुरक्षितता धड्यामध्ये संगीत, कठपुतळी शो, नकला आणि वर्कशीट आदी  कृतींचा वापर केला जातो. यामुळे मॉड्यूल परस्पर कृतीशील बनते व मुलांना माहितीवर प्रक्रिया करण्यासाठी आणि त्यांना शिकविलेले कौशल्य वापरण्यास वेळ उपलब्ध करून देते.

धडे पूर्ण झाल्यावर,  अर्पण प्रकल्पाचा एक महत्वाचा घटक म्हणजे प्रशिक्षक प्रत्येक मुलाशी एक-एक करून भेटतात आणि  त्यांच्या शंका, गोंधळ दूर करतात आणि महत्त्वाचे संदेश पुनःपन्हा उच्चारतात. अशा प्रकारचे परस्परसंवाद आणि गृहपाठ पत्रकांच्या मूल्यांकनाने प्रशिक्षकांना मुलांची आकलन पातळी जाणून घेण्यास मदत होते. प्रशिक्षक विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी शाळा / बाह्य समुपदेशक सुचवू शकतो. मुलांनी शिकलेले संदेश धारण करून ठेवण्यासाठी शाळेने प्रत्येक वर्षी पीएसई मॉड्यूल पुढे सुरु ठेवायला पाहिजे आणि पालकांनी सुद्धा एका नियमित अंतराने मुलांकडून हे संदेश पुनःपन्हा वदवून घ्यायला पाहिजे हे महत्वाचे आहे.

प्रश्न viii

## विशेष गरजा असणाऱ्या मुलांना आपण वैयक्तिक सुरक्षा कशी शिकवू शकतो?

“विशेष” किंवा “अक्षम” किंवा “अपंग” किंवा “आव्हान” म्हणून दर्शविलेले असे लोकसंख्येचे विविध घटक आहेत. प्रत्येक गटाच्या खास गरजा आणि असुरक्षा आहेत. साधारणपणे, मानसिक/ शारीरिकरित्या अपंग मुले लैंगिक शोषणाचे बळी ठरू शकतात कारण त्यांना प्रौढांकरून जास्त काळजीची गरज असते ( जे संभाव्य शोषणकर्ता असू शकतात ). सर्व मुलांना स्वतःला सुरक्षित ठेवण्यासाठी त्याच माहितीची आवश्यकता असते. पण विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी, कंटेंटचे काही पैलू आणि माध्यमे ज्यांच्या मार्फत माहिती पोहोचवायची आहे, ते त्यांच्या विशिष्ट आव्हाने त्यावर अवलंबून असून वेगवेगळे असू शकतात.

मुलांचे सबलीकरण करतांना, त्यांचे पालक आणि काळजीवाहकांचे सुद्धा सबलीकरण करणे महत्वाचे आहे कारण अपंग मुलं विशिष्ट परिस्थितीत स्वतःचे संरक्षण करू शकत नाही. यामुळे इथे आपला उद्देश हा आधार यंत्रणेला अधिक विस्तृत करून त्याला सशक्त करणे आणि मुलांमध्ये आणि त्यांच्या काळजीवाहकच्या दरम्यान संवाद सुधारणे असा आहे.

उदाहरणार्थ, कर्णबधीर मुलांच्या बाबतीत, शरीराच्या माध्यमाने संवाद साधण्यासाठी गरज कधी कधी त्यांना अधिक धोकादायक ठरू शकते. त्यांना वैयक्तिक सुरक्षिततेचे शिक्षण देतांना, आम्ही त्यांना आमचे संदेश दृश्य / शब्द्शून्य माध्यमातून पोहोचवतो आणि अशा विशिष्ट परिस्थितीत लक्ष केंद्रित करतो जे त्यांना अधिक / विविधप्रकारे संवेदनशील बनविते. तसेच, जी मुलं व्हीलचेअरवर हालचाल करतात, अशा शारिरीक अपंग मुलांनवर लक्ष केंद्रित करून नेहमी विविध मार्गाने मदत मिळविणे शिकविले जाते कारण असुरक्षित परिस्थितीतून पळून जाणे त्यांना नेहमी शक्य नसेल. अपंग मुलांना त्यांचे शरीर कसे विस्मयकारक, अद्वितीय आणि विशेष आहे हे सांगणे महत्वाचे आहे कारण बव्हंशी समाज त्यांना विपरीत गोष्ट सांगत असते! तसेच कृपया  ‘मुले त्यांच्या अपंगत्वा सोबत कसे राहतात’ हा भाग पहा.

प्रश्न ix

## मुले सहसा प्रौढव्यक्ती दरम्यान लैंगिक कृती बघतात किंवा त्यांच्या राहणीमानामुळे सुस्पष्ट लैंगिक वर्तणूक आणि संदेशाचा अनुभव घेत असतात. अशा स्थितीमध्ये त्यांच्याशी वैयक्तिक सुरक्षे बद्दल बोलणे कितपत व्यावहारिक आहे?

मुलांनी  त्यांचे पर्यावरण समजून घेणे आवश्यक आहे. समजून घेण्याच्या अभावाने ताण आणि शक्य अयोग्य लैंगिक वर्तन निर्माण होते.

त्यामुळे, वैयक्तिक सुरक्षितता शिक्षण सुरु करण्या आधी, शिक्षकांना मुलांची पार्श्वभूमी आणि त्यांच्या वास्तव जीवनाचे काळजीपूर्वक अध्ययन करणे आवश्यक आहे. यामुळे आम्हाला मुलांचा संदर्भ समजून घेण्यास मदत होईल आणि योग्य आणि अयोग्य वर्तन बाबत पुरेसा संदेश वितरीत करण्यासाठी मदत होईल. या संदर्भात हे देखील महत्वाचे आहे कि आई-वडील /काळजीवाहू व्यक्ती आणि मुले दोन्हीची परिस्थिती हाताळावी जेणेकरून पालक गोपनीयता राखण्यासाठी अतिरिक्त प्रयत्न करू शकतील, मुलांना देखील समजवता येऊ शकते कि प्रौढांनी त्यांच्या भावना एका विशिष्ट प्रकारे(लैंगिक) व्यक्त करणे सामान्य आहे. जी मुलं लैंगिक वर्तन बघतात ती अनेकदा गोंधळात पडतात किंवा ते बघून पोरकटपणे लैंगिक कृती करतात. वैयक्तिक सुरक्षा मुलांना ते जे पाहतात त्यांना वयानुसार संदर्भ देते, त्यांच्या प्रश्नांना गंभीर रीतीने उत्तर देण्याची संधी देते आणि वयानुसार आचरण प्रदान करते. हे पालकांना देखील एका संभाव्य लाजीरवाणी परिस्थितीत मदत उपलब्ध करून देते.

प्रश्न X

## मुले वास्तविक जीवनात उद्भवणाऱ्या कोणत्याही असुरक्षित परिस्थितीला तोंड देण्यासाठी त्यांनी वैयक्तिक सुरक्षा वर्गात शिकलेली माहिती आणि कौशल्याचा वापर करू शकतील काय?

होय. आमच्या अनुभवानुसार, वैयक्तिक सुरक्षा शिक्षण वर्गानंतर मुलांनी शोषण प्रयत्नाला 'नाही' म्हणून ठामपणे सांगितले आहे, अशा परिस्थितीपासून दूर गेले आहेत आणि विश्वसनीय प्रौढ व्यक्तीकडून मदत मागितली आहे, असे अनुभव त्यांनी आम्हाला सांगितले आहेत. इतर देशांच्या संशोधनातून हे सिद्ध झाले आहे कि मुलांना वैयक्तिक सुरक्षा शिकविल्यास, शोषणकर्ते अशा मुलांपासून दूर राहतात आणि काही स्वरूपात मदत मिळविणाऱ्या मुलांची संख्या वाढते. भारतात अजूनही हा प्रश्न संशोधनाच विषय आहे, पण तरी देखील आम्हाला आतापर्यंत विश्वास वाटत आहे.


वैयक्तिक सुरक्षा शिक्षण हे जीवन कौशल्य मॉड्यूल आहे. जीवन कौशल्य दररोजच्या जीवनाची मागणी आणि अव्हानाला सामोरे जाण्यासाठी मुलांना सकारात्मक वर्तनाने सशक्त करते. पण मुलांना सुरक्षित ठेवण्यासाठी मुलांच्या सबलीकरणापुढे जाऊन प्रौढ व्यक्तींचे सबलीकरण करणे गरजेचे आहे.

जीवन कौशल्य मार्गदर्शिका म्हणून, पीएसई मुलांना माहितीपूर्ण निर्णय घेण्यास, बारकाईने आणि कल्पकतेने विचार करण्यास, प्रभावीपणे संवाद साधण्यासाठी आणि सुरक्षित तसेच निरोगी संबंध आणि आचरण ओळखण्यासाठी मुलांना सक्षम करते. माहिती आणि कौशल्य शिक्षण हे वायोचित असते आणि सराव सत्र आणि प्रक्रिया अभ्यास यात समाविष्ट असतो. या प्रशिक्षणा द्वारे मूल केवळ वैयक्तिक सुरक्षाच शिकत नाही तर ते असुरक्षित परिस्थितीचा सामना करण्यासाठी या कौशल्याचा वापर करण्यासाठी सक्षम बनतात.

जर हे संदेश वारंवार सांगितले आणि काळजीवाहूंकडून तेच कौशल्य अधिक धारदार केले गेले तर मुलं या ज्ञान आणि कौशल्याचा वापर करून वास्तविक जीवनातील घटनांना चांगल्या तर्हेने हाताळण्यासाठी सज्ज होतात. जेव्हा मुले एखाद्या मोठ्या व्यक्तीचे किंवा अशा व्यक्तींचे जे त्यांना आवडतात, ज्यांचावर त्यांचा विश्वास आहे, ज्याना ते भितात किंवा ज्यांचा ते आदर करतात अशा व्यक्तींच्या शोषणाला बळी पडतात तेव्हा त्यांना शरण जाण्याशिवाय पर्याय नाही असे त्यांना वाटते. शेवटी, मुलांना प्रश्न न विचारता आदर आणि आज्ञा पाळणे शिकवले जाते! शिवाय, अनेक मुलांमध्ये वैयक्तिक सुरक्षा वर्गात ते जे काही शिकतात त्याचा सराव करण्यासाठी आत्मविश्वास आणि आत्मसन्मान नसतो. PSE मध्ये यासारखे काही मुद्दे आम्ही हाताळतो. आम्ही त्यांना हे समजण्यासाठी मदत करतो की ते अद्वितीय आणि विशेष व्यक्ती आहेत आणि त्यांना स्वत:चे संरक्षण करून

सुरक्षित राहण्याचा अधिकार आहे. आम्ही सतत सांगत असतो कि जर कोणी स्पर्श नियम तोडत असेल तेव्हा तो अन्यायग्रस्त व्यक्तीचा/बळीचा दोष कधीच नसतो.

# 11



# बाल लैंगिक शोषणाच्या केसेस मध्ये हस्तक्षेप करणे

प्रश्न i

## जर मला बाल लैंगिक शोषणाचा एखादा बळी आढळल्यास मी काय करावे ?

हे फार महत्वाचे आहे कि आपण एक प्रौढ म्हणून आपण आपल्या मुलाला एक सुरक्षित वातावरण द्यायला पाहिजे जेणेकरून त्यांच्यासोबत काय घडले त्याची ते चर्चा करू शकतील.

अ) त्याच्या अथवा तिच्या अनुभवांबद्दल बोलण्यासाठी मुलाला प्रोत्साहन द्या, परंतु न घडलेली घटना सूचित न करण्याची काळजी घ्या - अनेकदा मुलांना प्रौढ व्यक्तींना खुश करणे आवडते आणि प्रौढ जे काही सुचवतात त्याच्याशी ते सहमत होतात. मुलाला बोलण्यास प्रोत्साहन करण्याचा एक चांगला मार्ग म्हणजे आपण सक्रिय श्रोते बनणे, मुलाबद्दल किंवा शोषणकर्त्याबद्दल किंवा काय घडले याबद्दल मत बनवू नका. “का” असे शब्द

विचारण्या ऐवजी असे प्रश्न विचारणे जसे "पुढे काय झालं?" यामुळे अंतिमत्व कमी होईल.

ब) शांत राहा. भावना व्यक्त करणे टाळा जेणेकरून मुलाच्या माहिती देण्याच्या क्रियेवर प्रभाव पडणार नाही - अशा भावनांमध्ये राग (मुलाला वाटेल कि तुम्ही त्याच्यावर / तिच्यावर रागावले आहात) दु: खी (मुल अंतर्मुख होईल कारण तुम्ही तिच्या / त्याच्या मुळे दु:खी झालात असे तिला/त्याला वाटणार नाही).

मुलाला घडलेल्या घंटनेची पुनरावृत्ती करण्याचा आग्रह करू नका किंवा असे प्रश्न विचारू नका कि ज्यामुळे मूल घाबरेल किंवा मूल बळी पडेल

ड) कृपया मुलाला सांगा कि समोर येणे आणि भावना व्यक्त करणे हे धैर्याचे काम आहे आणि आपण त्याला शक्य तेवढी मदत करण्याचा प्रयत्न करू. मदत प्रक्रियेचा एक भाग म्हणून मुलाचा समावेश करणे आहे. आपल्याला पुढे काय करायचे आहे आणि मुलाला आपण कसे सहभागी करून घेता ते मुलाच्या वयावर अवलंबून असेल. उदाहरणार्थ, एखादे मोठे मूल असल्यास त्याला आपण कोणाला सांगावे व कसे सांगावे असे पर्याय देऊ शकतो, पण लहान मुलांबद्दल आपले पर्याय मर्यादित असतील आणि त्यासाठी सहसा सर्वात आधी शांत आणि समंजस पालकांना सामील करू शकता

इ) सध्या सुरू असलेल्या शोषणाच्या बाबतीत, मुलाची सुरक्षा सर्वात महत्वाची आहे त्यामुळे पहिले पाऊल म्हणजे शोषण लगेच थांबेल याची खात्री करणे आहे. अशा परिस्थितीत तुम्हाला मुलाचे आई-वडील / शिक्षक / काळजीवाहू व्यक्तींचा समावेश करण्याची आवश्यकता आहे. याचाच अर्थ जर गुन्हेगार वडील घर सोडून जात नसेल आणि आई मुलाला मदत करत नसेल, तर अशा स्थितीत मुलाला त्या घराच्या बाहेर सुरक्षित ठिकाणी ठेवावे लागेल(शक्यतो नातेवाईक किंवा अंतिम पर्याय म्हणून संस्था इत्यादि).

फ) कृपया मुलांशी प्रामाणिक रहा आणि मूलाला कळवा कि तुम्ही चर्चा गुप्त ठेवाल आणि केवळ अशाच लोकांना सांगाल ज्यांच्या मार्फत तिला / त्याला सुरक्षित ठेवता येईल

मुलाला असे म्हणत धीर द्या कि त्याने / तिने कोणतीच चूक केली नाही. मुलाने तुमच्याशी संवेदनशील विषयावर बोलणे पसंत केले याचा अर्थ त्याचा तुमच्यावर विश्वास आहे. हे लक्षात घेऊन, मुलाला आपण विचारावे की पुढील सांगण्याची प्रक्रिया ते कशी चालू ठेवू इच्छितात, जसे त्यांना घेऊन पुढील चरणावर बोलणी चालू ठेवणे .

ह) केवळ आरंभीच्या चर्चेनंतरच समुपदेशकाला सहभागी करून त्याला / तिला आधार देण्यासाठी मदत शोधा. म्हणजेच, मदत मिळवण्यासाठी मुलाचे बोलणे थांबवू नका. मुलाला आपण पुढे काय करणार आहात ते कळवा आणि त्या पावलांसाठी तयार करा. त्यांचे शक्य तितके सहभाग घेणे महत्वाचे आहे.

आय)जर मुलाचे लैंगिक शोषण घडून आले असेल तर मुलाच्या वैद्यकीय तपासणीची व्यवस्था करा. असा वैद्यकीय व्यावसायिक निवडा ज्याला मुलांची चाचणी आणि लैंगिक आणि शारीरिक जखम ओळखण्याचा अनुभव आहे आणि जो मुलांबद्दल संवेदनशील आहे.

ज) मुलाला / कुटुंबाला एफआयआर दाखल करायचे असल्यास, अनुभवी कायदेशीर तज्ञाकडून कायदेशीर मदत मिळविण्याचा प्रयत्न करा.

के) हे नेहमी लक्षात ठेवा कि उपचार आणि न्यायाच्या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान मुलाच्या आवडी आणि गरजांना प्राधान्य देणे फार महत्त्वाचे आहे.

प्रश्न ii

## लैंगिक शोषणाच्या बाबतीत जो व्यक्ती त्या कुटुंबाचा सदस्य नसेल तर तो कसे आणि किती प्रमाणात हस्तक्षेप करू शकतो?

जवळच्या नातलगाशी लैंगिक संबंधाच्या बाबतीत, एक कुटुंब सदस्य नसलेला व्यक्ती खालील प्रकारे मध्यस्ती करू शकतो:

अ) आपण कुटुंबाच्या समजूतदार सदस्याशी संपर्क करून त्याला/तिला विश्वासामध्ये घेऊ शकता. आपण एक गोष्ट लक्षात ठेवायला पाहिजे कि नवरा किंवा बायको किंवा प्रिय व्यक्तीवर संशय करणे फार कठीण असते. त्यामुळे, आपण समजूतदार कुटुंब सदस्यासोबत धीर धरणे आवश्यक आहे. समजूतदार पालक जो पर्यंत ते स्वत: समर्थीत आहेत ते मुलाचे समर्थन करीत राहणार.

ब) आपण सध्या सुरू असलेल्या बालकाचे शोषण थांबविण्यासाठी आणि मुलाची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी बाल लैंगिक शोषणावर काम करीत असलेल्या संस्थेची मदत घेऊ शकता. देशाच्या विविध भागामध्ये काम करणाऱ्या काही संस्था आहेत जे हेल्पलाईन पासून तर कायदेशीर मदत यासारखी सेवा प्रदान करीत आहेत. या विषयावर काम करणाऱ्या संस्थांची माहिती जाणून घेण्यासाठी; या दस्तऐवजाच्या शेवटी दिलेल्या संस्थेच्या यादीचा संदर्भ घ्या.

क) कुटुंबाच्या बाहेरील व्यक्ती या प्रक्रियेत बाल कल्याण समिती (सीडब्ल्यूसी)चा समावेश करू शकते. मुलांचे संगोपन व संरक्षणाची गरज यासंबंधी फक्त सीडब्ल्यूसीलाच अधिकार देण्यात आलेले आहेत; जसे उपचार, पुनर्वसन तसेच पुनर्बहाल आणि पुन्हा सामाजिक एकीकरण.

तथापि, एकदा सीडब्ल्यूसी सहभागी झाली तर ती घरातून मुलाला स्थलांतरीत करण्याचा आणि मुलाची काळजी घेण्यासाठी आणि संरक्षण देण्यासाठी कुटुंब 'अयोग्य' म्हणून कुटुंब जाहीर करण्या सारखे निर्णय घेण्याचे एकमेव अधिकार तिच्या कडे असतात. यासाठी, पुरेसा विचारविनिमय केल्यानंतर सीडब्ल्यूसी संपर्क करण्याचा निर्णय घेतला पाहिजे.

प्रश्न iii

## एखादया प्रौढ व्यक्तीचे अनुचित वर्तन मी कसे हाताळू शकतो ?

व्यक्ती बद्दल मत मांडण्या ऐवजी त्याच्या वर्तनाला प्रतिसाद देणे महत्वाचे आहे.

शक्य प्रतिसादासाठी २ संपर्क बिंदू आहेत:

अ) जर आपण अनुचित वर्तन ओळखू शकला तर

ब) जर मुलाने आपल्याला कोणत्याही अयोग्य वर्तनाबद्दल सांगितले असल्यास

जर आपण एखादे अयोग्य वर्तन ओळखले आहे (जसे की, एखाद्याचा एक "विशेष" बाल मित्र असणे, मुलांना गप्प बसण्यास आणि गुपिते ठेवण्यास प्रोत्साहन देणे, किंवा खाजगी नजराणे देणे) किंवा कोणतेही लैंगिक संवाद (जसे, मुलांच्या खाजगी अवयवांची टिंगल करणे, लैंगिक शब्द वापरून मुलांचे वर्णन करणे, किंवा मुलांच्या बाबतीत योग्य वर्तन काय आहे याबद्दल अस्पष्टता) तर त्या व्यक्तीशी बोलणे महत्वाचे आहे. व्यक्तीशी भांडू नका तर, फक्त त्याच्या गैरवर्तनाचा मुकाबला करा. आपण वर्तनाबद्दल स्पष्ट असावे पण सामान्य विधान करू नये; उदाहरणार्थ, "मी तुला नेहमीच तरुण मुलींचे लैंगिक शोषण करतांना पाहतो" च्या ऐवजी "मी तुला गेल्या सोमवारी एम च्या कुल्ल्यांवर वर स्पर्श करतांना पाहिले". व्यक्तीला हे कळू द्या कि आपण त्यांचे खोट्या आरोपांपासून संरक्षण करण्याचा प्रयत्न करीत आहात तत्वतः आपण मुलांचे शोषणापासून संरक्षण करण्याचा प्रयत्न करीत आहोत. खरी गोष्ट ही की तुम्ही त्या व्यक्तीला ओळखून आहात.

जर मूल आपणास काही सांगत असेल तर, त्याचे ऐकून घ्या पण स्पर्शाच्या / गैरवर्तनाच्या वेळी मुलाच्या भावना तपासू शकता.
जर असले वर्तन शोषणामध्ये परिवर्तीत होत असल्यास, आपण जी व्यक्ती हा विषय हाताळू शकते त्याच्या कडे ही केस सुपूर्द करणे महत्वाचे आहे.

# 12



# चिंतेचे मुद्दे आणि धास्ती

प्रश्न i

## पालक लैंगिक शोषणासारख्या संवेदनशील संकल्पनांबद्धल कसे बोलू शकतील?

पालकत्व सोपे काम नाही. पालक आव्हाने स्वीकारतात आणि मुलांना त्यांच्यातील संभाव्य गुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांना सुरक्षित ठेवण्यासाठी मदत करतात.

त्यांच्या वैयक्तिक सुरक्षेबद्दल मुलांशी बोलत राहणे हे मूल सुरक्षित आहे आणि असुरक्षित परिस्थितीला सामोरे जाण्यास सज्ज आहे हे सुनिश्चित करण्यासाठी एक महत्वाचे पाऊल आहे. ज्या प्रकारे समाज या मुद्द्यांना हाताळतो आणि ज्या वातावरणात ते लहानाचे मोठे झाले आहे त्यामुळे पालकांना लज्जास्पद/अस्वस्थ वाटणे स्वाभाविक आहे. वैयक्तिक सुरक्षा शिक्षण भविष्यातील पेच टाळण्यासाठी आणि वाढणाऱ्या मुलांशी संवाद सुरू ठेवण्यास मदत करण्यासाठी योग्य शब्दसंग्रहाचा परिचय करून देतो. उदाहरणार्थ, स्पर्श नियम (त्यांना स्वच्छ आणि निरोगी ठेवणे वगळता कोणालाही आपल्या खाजगी अवयवांना स्पर्श करणे,

पाहणे किंवा त्याबद्दल बोलणे हे कधीही योग्य नसते) हा सोपा नियम असुरक्षित परिस्थिती ओळखण्यासाठी मदत करतो मग ते एखाद्या अनोळखी व्यक्ती कडून स्पर्श करणे असो किंवा चुलत्याद्वारे अश्लील साहित्य दाखविण्याचा प्रकार असो. वैयक्तिक सुरक्षा शिक्षणाबद्दल अधिक माहिती जाणून घेण्यासाठी, 'वैयक्तिक सुरक्षा' या विभागाचा संदर्भ घ्या.

आपल्या मुलाशी बोलण्याची तयारी करा:

अ) स्वत: विषय समजून घ्या.

ब) आवश्यक शब्दसंग्रहाशी ओळख करून घ्या. आपणास शब्द किंवा विषयाबद्दल अस्वस्थ का वाटू शकते हे समजून घ्या. सर्व प्रथम आपल्या पती, पत्नी आणि मित्रांसोबत हे शब्द वापरून पहा. जर आपणास अस्वस्थ वाटत असेल, तर, आपल्या मुलांना ते समजेल. मुलांना आपल्या अस्वस्थतेचे कारण माहीत झाल्यास ते तुमच्याशी बोलणार नाहीत कारण ते तुम्हाला तुमच्या स्वत:पासून रक्षण करू पाहत आहेत. आणखी एक कारण म्हणजे, त्यांना भीती असू शकते कि जर त्यांनी खाजगी अवयांचा शब्दसंग्रह वापरला तर त्यांना शिक्षा होईल. मदतीचे इतर पर्याय कुटुंबा बाहेर जसे संकेतस्थळ असू शकतात (अर्पण संकेतस्थळावर सूचीबद्ध केलेले आहे) किंवा बालरोगतज्ञ / स्त्रीरोग तज्ञ / समुपदेशकां पासून व्यावसायिक मदत घेऊ शकता.

क) शिकवता येण्यासारखा क्षण वापरा. म्हणजेच, कधी कधी तो विषय ठरवण्यासाठी आपण वेळ पाहण्या आधीच विषय उद्भवतो. शिकवता येण्यासारखा क्षण म्हणजे जेव्हा मुले प्रश्न विचारतात किंवा त्यांना परिचित असलेल्या व्यक्तीसोबत काहीतरी घडते. या शिकवता येण्यासारख्या क्षणाला शक्य तेवढे वापरा.

प्रश्न ii

## कधी कधी लहान मुले त्यांच्या खाजगी अवयवांना स्पर्श करतांना दिसतात, हे सीएसए चे एक लक्षण असू शकते का किंवा ते एका व्यक्तीचे लैंगिकतेविषयी एक नैसर्गिक प्रतिबिंब असू शकते?

प्रत्येक कृतीकडे तिच्या संदर्भित चौकटीतून पहिले पाहिजे. काळजीवाहू म्हणून तुम्ही अशा प्रसंगावर प्रतिक्रिया देण्याआधी, मूल त्याच्या खाजगी अवयवांना का, कसे आणि कधी स्पर्श करते, हे तुम्हाला माहित असले पाहिजे. मुलाची/मुलीची त्याच्या/तिच्या जननेन्द्रीयांच्या बद्दलची उत्सुकता हे मुलाच्या लैंगिक शोषणाचे दर्शक नाही. मुले त्यांच्या खाजगी अवयवांना- उत्सुकतेपासून - अनावधानापासून ते बरे वाटण्यापर्यंत विविध कारणांनी स्पर्श करतात, हे माहिती असणे महत्त्वाचे आहे. मुले बऱ्याचदा विकसित होत असतानाची उत्सुकता म्हणून लैंगिक वर्तन करतात. हे अतिशय नैसर्गिक आहे आणि 'तसे करू नका' असे सांगितले की मुले सामान्यपणे असे करायचे थांबतात किंवा नैसर्गिकरीत्या मोठी झाली की असे वर्तन थांबवतात.

तरीसुद्धा, काळजीवाहू म्हणून ह्या घटनेमध्ये कठोरपणे न बोलता, लज्जित न होता किंवा त्या घटनेकडे अवास्तव लक्ष न देता तुम्ही योग्य प्रतिसाद देणे महत्त्वाचे आहे.

उदाहरणार्थ, मुलाला सतत वैयक्तिक सुरक्षा नियमांची आठवण करून देणे पुरेसे असेल. जेव्हा मुलांचे आपल्या खाजगी अवयवांना स्पर्श करणे इतके वाढेल की ते त्यांच्या रोजच्या इतर कृतींवर परीणाम करू लागेल, तेव्हा अशा वर्तनाचे मूळ कारण काय आहे, हे तुम्हाला शोधून काढावे लागेल. कदाचित असे असेल की मुलाने स्वत: लैंगिक शोषणाचा अनुभव घेतला असेल किंवा लिंग किंवा लैंगिकता ह्याबद्दल मुले गोंधळलेली असू शकतील. अशा घटनांमध्ये,

मुलांना नाजूकपणे हाताळण्याची गरज आहे आणि जर चुकीचे वर्तन सुरूच राहिले तर मुलांना उपचारात्मक आधारासाठी पाठवण्याची गरज आहे.

प्रश्न iii

## मुले इतर मुलांशी खेळत असताना त्यांची उत्सुकता आणि इतर मुलांचा शोध (एक्सप्लोरेशन) आपण कसे हाताळावे?

बच्चों को उनके सवालों और चिंताओं का मुलांना प्रश्न विचारण्याचा आणि त्याच्या शंकांना वेळेत आणि आदरपूर्वक उत्तरे मिळवण्याचा अधिकार आहे. म्हणजेच मुलांनी विचारल्यावर प्रौढांनी त्यांच्या वयाला योग्य अशी माहिती द्यावी आणि त्यांच्या प्रश्नांची गांभीर्याने उत्तरे द्यावीत ( म्हणजेच, मुलांचे प्रश्न किंवा त्यांची उत्सुकता पाहून हसू नये.) मुले आणि पालक यांच्यामधला मनमोकळा संवाद हाच तुमच्या मुलांना सुरक्षित ठेवण्यासाठी सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणून काम करतो.

पालकांनी आणि शिक्षकांनी मुलांना समजेल अशा प्रकारे माहिती द्यावी. वैयक्तिक सुरक्षेचे पाठातील शब्द आणि संदर्भ ह्या बाबतीत उपयोगी ठरतील : खाजगी अवयवांसाठी वापरलेले शब्द, सुरक्षेचे सोपे नियम आणि वयानुसार योग्य साधी उदाहरणे वापरणे- हे पाठ पालक स्वत:च्या उपयोगासाठी वापरू शकतील. लहान मुलांसाठी, वैयक्तिक सुरक्षेचे वर्कबुक पालक त्यांच्याबरोबर वापरू शकतात. पालक/शिक्षक यांनी जास्त जागरूक आणि प्रेमळ असायला हवे आणि मुलांच्या कृतींबद्दल त्यांच्याशी हळुवारपणे संवाद साधावा. त्याचवेळी, मुलांना स्वत:च्या भावना स्वीकारता येतील, समजतील, आणि आदर वाटेल अशी कौशल्ये मुलांकडे असण्याची गरज आहे.

जेव्हा मुले मोठी होतात, तेव्हा त्यांना मित्रांच्या गटामध्ये मिसळून जायचे असते. समवयस्कांकडून येणारा दबाव बैचेन करणारा किंवा कधी कधी धोकादायक (अंमली पदार्थ, दारू, लैंगिक संबंध) ठरू शकतो. कधी कधी समवयस्कांच्या संमतीसाठी मुले स्वत:ला धोकादायक स्थितीमध्ये लोटू शकतात. पालक मुलांना आधार देऊ शकतात आणि मुलांना राग येईल, दु:खी वाटेल किंवा गोंधळून टाकेल अशा असुरक्षित किंवा अडचणीत टाकणाऱ्या स्थितीत  आपण आहोत असे त्यांना वाटेल, अशा प्रकारे कुणी त्यांना स्पर्श केला तर त्यांना नाही म्हणण्याचा अधिकार आहे, याबद्दल मुलांना आत्मविश्वास दिला पाहिजे. पण किशोर वयातील (१३ ते १९ वयोगटातील) मुलांना नवीन नियम तयार करायचे असतात आणि नवीन जबाबदाऱ्या घ्यायच्या असतात, त्यामुळे कधीकधी ही मुले ठरलेले नियम मोडतात, ही सामान्य गोष्ट आहे. म्हणजेच कधीकधी मुले एकमेकांबरोबर लैंगिक वर्तन करतात. (म्हणजेच स्पर्शाचे नियम मोडतात.)

किशोर वयातील मुलांना पालकांनी योग्य आणि सकारात्मक शिस्त लावणे आणि त्यांचे अनुभव समजून घेणे आणि त्यातून शिकायला लावणे महत्त्वाचे आहे. त्याऐवजी, पालक मुलांना मारहाण करत किंवा कठोरपणे बोलून त्रास देत राहिले, तर त्यामुळे मुले पालकांच्या आधारापासून दूर जाऊ शकतात आणि मुलांचे गैरवर्तन सुरु राहू शकते.

प्रश्न iv

## मुले आपल्या पालकांना संभोग करताना चुकून पाहतात, अशा घटनेमध्ये आपण कोणता प्रतिसाद दिला पाहिजे ?

मुलांनी चुकून आपल्या पालकांना संभोग करताना पाहिले, तर ही लैंगिक शोषणाची घटना होत नाही. पण पालकांनी संभोग करताना खाजगीपणा ठेवण्याचा प्रयत्न करण्याची गरज आहे. या घटनेची मुलांबरोबर चर्चा करणे महत्त्वाचे आहे आणि मनमोकळा संवाद सुरु करण्याची गरज आहे. कोणत्याही परीस्थितीमध्ये ही घटना टाळू नये आणि त्याबद्दल मुलांना खोटे सांगू नये.

मुलांच्या वयानुसार योग्य माहिती त्यांना मनापासून दिली पाहिजे नाहीतर त्यांना परस्परविरोधी संदेश मिळू शकतात. मुले इतर

स्रोतांकडून माहिती मिळवतील अशी सुद्धा शक्यता आहे, बऱ्याचदा हे स्रोत म्हणजे मिथके किंवा पोर्नोग्राफी असू शकतात. मुलांना लहानपणापासून वैयक्तिक सुरक्षेचे शिक्षण मिळाले असेल आणि पालकांनी मुलांबरोबर संवादाचे चांगले मार्ग आधीपासून तयार केलेले असतील तर अशा घटना हाताळणे पालक आणि मुले दोघांसाठी सोपे जाते.

प्रश्न v

## बाळ कसे जन्माला येते, असे मुलांनी विचारल्यावर आपण काय उत्तर दिले पाहिजे?

मुले जिज्ञासू असतात आणि असंख्य प्रश्न विचारतात ; मुले मोठी होत असतात आणि त्यांना रोज नव्यानव्या गोष्टी दिसत असतात. जेव्हा मुले प्रश्न विचारतात, तेव्हा आपण त्यांच्या वयानुसार प्रामाणिक उत्तरे दिली पाहिजेत. अशी उत्तरे देण्याचा कोणताही एकच मार्ग नाही कारण प्रत्येक मूल वेगळे आहे आणि वेगळ्या गोष्टी त्याला वेगळ्या प्रकारे समजतात. अशावेळी, मुलांवर चिडणे किंवा लज्जित होणे( लाज वाटल्याचे दाखवणे) चुकीचे आहे किंवा मुलांना असे प्रश्न विचारण्यापासून न रोखणे किंवा प्रश्नांकडे दुर्लक्ष न करणे महत्त्वाचे आहे. मुलांना त्यांच्या वयानुसार योग्य उत्तरे देण्यासाठी मदत व्हावी म्हणून पालक माहितीचे वेगवेगळे स्रोत शोधू शकतात. जर एखाद्या प्रश्नाचे उत्तर त्या वेळी पालकांना माहित नसेल तर पालक मुलांना तसेही सांगू शकतात.

त्यानंतर उत्तर शोधणे आणि मुलांना सांगणे ही पालकांची जबाबदारी आहे. पालकांनी प्रश्नाचे उत्तर टाळण्याची सबब म्हणून ही गोष्ट वापरू नये किंवा मुलांनी दुसऱ्यांदा हा प्रश्न विचारावा म्हणून वाटही पाहू नये.

मुलांना योग्य पद्धतीने शिक्षण देण्याचा प्रयत्न करताना पालक/काळजीवाहकांनी आपल्या अस्वस्थतेवर मात करण्याची गरज आहे. जर गरज वाटली तर फॅमिली डॉक्टर/स्त्रीरोगतज्ज्ञ/ बालरोगतज्ज्ञ/समुपदेशक यांच्याकडून व्यावसायिक मदत आपल्याला घेता येते, कारण या व्यक्ती मुलांना संबंधित विषयाची योग्य माहिती देऊ शकतात. तथापि, बाळ होण्याच्या संबंधी प्रश्नांची योग्य उत्तरे देण्यासाठी आपल्याला वैयक्तिक सुरक्षा शब्दसंपत्तीचा उपयोग होऊ शकेल.

प्रश्न vi

## पालकांपैकी एकजण कपडे बदलत असताना, त्या खोलीत मुलांना जाण्याची परवानगी नसते पण दुसरा पालक मात्र जाऊ शकतो, असे का? असा प्रश्न मुलांनी विचारला तर पालकांनी त्यांना काय उत्तर द्यावे?

छोट्या मुलांना स्पर्शाच्या नियमांची आठवण करून देऊन पालक ह्या प्रश्नाचे उत्तर देऊ शकतात. पण, मोठ्या मुलांचे ह्या उत्तराने समाधान होणार नाही आणि वडील कपडे बदलत असताना आईला त्या खोलीत जाण्याची आणि आई कपडे बदलत असताना वडीलांना त्या खोलीत जाण्याची परवानगी का आहे? असा प्रश्न ते विचारू शकतात. लैंगिकता म्हणजे केवळ खाजगी अवयव नव्हे तर खाजगीपणा आहे.

नात्यांमध्ये लैंगिकता आणि खाजगीपणा याचे विशेष महत्त्व आहे आणि विविध नात्यात लोक वेगवेगळ्या प्रकारे वागतात. उदाहरणार्थ, आपण मित्राचा हात धरतो, पालकांना मिठी मारतो, शेजाऱ्यांना बोलून अभिवादन करतो, दुकानदाराला नुसते हात हलवून अभिवादन करतो. तसाच फरक नवरा-बायको आणि पालक-मुले यांच्यामध्ये आहे. उदाहरणार्थ, आपण पालकांचे आपल्या मुलांशी असलेले नाते आणि पालकांचे आपापसातले नाते यातला फरक पालक मुलांच्या लक्षात आणून देऊ शकतात. : “आई तुझी काळजी घेते का? तशीच काळजी ती तुझ्या मित्रांची किंवा शेजाऱ्यांची घेते का?” “ तुझ्या वडीलांची काळजी ती जशी घेते तशाच प्रकारे तुझी काळजी घेते का? काही गोष्टी आई

फक्त तुझ्यासाठी करते आणि काही गोष्टी ती वडिलांसाठी करते किंवा कुटुंबातील इतरांसाठी करते. तसेच वडील तुझी काळजी ज्या प्रकारे घेतात आणि इतर लोकांची ज्या प्रकारे काळजी घेतात त्यात फरक आहे. तुझे पालक एकमेकांवर वेगळ्याप्रकारे प्रेम करतात. आपल्या प्रत्येकाची वेगवेगळ्या लोकांसांठी वेगवेगळी जबाबदारी असते आणि त्यांच्यावर असलेले आपले प्रेम आपण वेगवेगळ्या प्रकारे व्यक्त करतो. तसेच तू मोठा झालास की/ झालीस की आता तुला करता न येणाऱ्या किंवा न समजणाऱ्या गोष्टी तुला करता येतील. आता तुझे पालक प्रौढ व्यक्ती असल्यामुळे त्यांचे एकमेकांशी वागणे आणि एकमेकांची काळजी करणे वेगळ्या प्रकारचे असते.”

प्रश्न vii

## मुलांना ह्या समस्येचे गांभीर्य कळावे म्हणून मी बातम्यांमधील किंवा क्राईम पेट्रोल, सावधान इंडीया अशा कार्यक्रमामधील गोष्टी सांगितल्या पाहिजेत का?

अशा गोष्टी सांगण्यामागे आपला हेतू चांगला असतो. पण बातम्यांमध्ये किंवा कार्यक्रमांमध्ये दाखवलेल्या अशा गोष्टींचा आशय मुलांच्या वयासाठी योग्य नसतो. हा आशय प्रौढ प्रेक्षकांच्यासाठी तयार केलेला असतो, मुलांसाठी नाही. त्यामुळे मुलांना भीती वाटेल किंवा त्यांची असुरक्षितता वाढेल, त्यामुळे ती अधिक संवेदनाक्षम होतील. सक्षमीकरण म्हणजे भीतीची भावना तयार करणे नव्हे. तर सक्षमीकरण म्हणजे वयाला योग्य अशा प्रकारे ज्ञान आणि कौशल्ये पुरवणे. त्यामुळे आपली मुले जागरूक बनतील आणि त्यांच्या स्वत:च्या सुरक्षेमध्ये सहभाग घेऊ शकतील.

प्रश्न viii

## जर मुलांनी पालकांपासून एखादी गोष्ट लपवली उदा. त्यांचा निकाल किंवा शाळेतील बैठक, तर पहिली प्रतिक्रिया म्हणजे मुलांना ओरडणे किंवा मारणे अशी असते, त्या ऐवजी अशा परीस्थितीत काय करता येऊ शकते?

पाश्चात्य देशात झालेल्या संशोधनात असे दिसून आले आहे की शारिरीक हिंसेचा शाळेतील निकालावर सकारात्मक परीणाम होत नाही आणि बऱ्याचदा त्यामुळे निकाल घसरतोच. मुलांना सकारात्मक पद्धतीने शिस्त लावण्यासाठी पालकांनी पर्यायी मार्ग शोधले पाहिजेत. हे अवघड आहे कारण आपले पालक आपल्याशी जसे वागले तसेच आपण आपल्या मुलांशी वागायला जातो. वेगळी पद्धत शिकायला आपल्याला वेळ लागतो. पण आपण सर्वजण खालील गोष्टी करण्याचा प्रयत्न करू शकतो:

अ. मुलाशी संवाद साधा आणि ही माहिती न सांगण्यामागचे त्याचे कारण आणि त्याचा / तिचा समज ह्याबद्दल त्यांना विचारा.

ब. त्याला/तिला वाटणाऱ्या आव्हानांचा सामना करण्यासाठी आपण एकत्र काम करू आणि समस्येचे उत्तर शोधू, अशी खात्री द्या.

जेव्हा आपण मुलांवर ओरडतो किंवा त्यांना मारतो, तेव्हा त्यांना शिक्षेचे कारण समजत नाही कारण त्याबद्दल बऱ्याचदा काही संवाद झालेला नसतो. मुलांचे ज्यांच्यांशी नाते असते, त्यांचे वागणे बघून मुले इतरांबरोबरचे आपले वागणे ठरवत असतात. मारणे / हिंसकपणे वागणे हे योग्य आहे, असे ते शिकतात. चुकीबद्दल संवाद साधणे आणि तसे वागण्याऐवजी कसे वागलेले अधिक चांगले झाले असते, हे मुलाला समजावून सांगणे अधिक चांगले.

पालक आणि मुले ह्यांच्यातील संवाद अतिशय महत्त्वाचा आहे आणि त्यामुळे मुलांना मोकळेपणाने बोलण्यास आणि आपल्या समस्या

पालकांना सांगण्यास अवकाश मिळतो.

प्रश्न ix

## शिक्षक मुलांना कोणत्याही लैंगिक हेतूशिवाय स्पर्श करतात, पण कधीकधी शिक्षकांवर मुलांच्या लैंगिक शोषणाचे आरोप होतात. काही शिक्षक तरुण असतात आणि मुले विरुद्ध लिंगाच्या शिक्षकांकडे कधीकधी आकर्षित होतात. तर ही मुलांची चूक आहे का आणि शिक्षकांची नाही?

1. आकर्षण वाटणे( क्रश) हे सर्वसामान्य आणि नैसर्गिक आहे. शिक्षकांना आपल्या मर्यादा आणि खोटे आरोप टाळण्याचे मार्ग माहित असले पाहिजेत.

2. शिक्षक सीमा / मर्यादा घालून घेऊ शकतात, विद्यार्थ्यांना स्पर्श करणे टाळू शकतात.

3. दार उघडे नसेल किंवा अजून कोणी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार उपलब्ध नसेल तर मुलांबरोबर एकटे राहू नका.

4. विद्यार्थ्यांना स्पर्श करण्यापूर्वी किंवा लहान विद्यार्थ्यांना मिठी मारण्यापूर्वी, असे करणे विद्यार्थ्यांना चालणार आहे का ? असे शिक्षकांनी विचारणे सगळ्यांत योग्य ठरते. मुलांना अस्वस्थ वाटले तर ते शिक्षकाला कधीही सांगू शकतात, अशी माहिती सुद्धा मुलांना द्या.

5. विद्यार्थ्यांना वाटणारी अस्वस्थता त्यांच्या चेहऱ्यावरील किंवा इतर भावांवरून दिसते, याबद्दल जागरूक राहा. जर स्पर्शामुळे येणारी अस्वस्थता विद्यार्थ्याने दाखवली, तर त्या प्रकारे शिक्षकाने विद्यार्थ्याला स्पर्श करू नये कारण संबंधित प्रौढाच्या हेतूपेक्षा मुलाला आरामदायी वाटणे जास्त महत्त्वाचे आहे.

6. काही वेळेला विशिष्ट वयातील मुले शिक्षकांबद्दलच्या कल्पनेत रमतात. पण, अशावेळी शिक्षक प्रौढ असल्यामुळे त्याने स्पष्ट मर्यादा ठेवल्या पाहिजेत आणि त्याबद्दल मुलांशी सुद्धा संवाद साधला पाहिजे. अशा घटनांमध्ये मुलाचा किंवा शिक्षकाचा कोणाचाही दोष नसतो पण अशा घटना व्यवस्थितपणे हाताळाव्या लागतात. पण, मुले, मुलगा किंवा मुलगी कोणीही असली तरी त्यांच्या जवळच्या प्रौढांचे लक्ष वेधून घेत असतात, ते लैंगिक / शारीरिक आकर्षण किंवा प्रेम असेलच असे नाही.

7. शाळेच्या बाहेर मुलांशी ईमेल द्वारे,सोशल मिडीया, फोन द्वारे कोणत्याही नात्यात विशेषत: लैंगिक नात्यामध्ये गुंतू नका.

प्रश्न x

## मुलांशी वयात येण्याबद्दल बोलण्यासाठी योग्य वय कोणते?

वयात येण्याबद्दल “बोलण्यासाठी” कोणतेही विशिष्ट वय नाही. पण जास्त वेळा बोलणे ही चांगली कल्पना आहे. वयात येण्याची कोणतीही लक्षणे दिसण्यापूर्वी त्याबद्दल बोलणे सर्वांत चांगले, म्हणजे मुलाला त्याचा धक्का बसणार नाही किंवा लाज वाटणार नाही. जर वेळ येण्यापूर्वीच काय होणार आहे हे मुलाला माहित असेल तर वयात येण्याबरोबर होणाऱ्या बदलांशी जुळवून घेणे त्यांच्यासाठी जास्त सोपे ठरते. काही पालक मुलांनी प्रश्न विचारेपर्यंत वाट पाहतात. जर तुमचे मूल लाजाळू असेल, किंवा प्रश्न विचारत नसेल, किंवा त्याला/ तिला आपल्या खाजगी अवयवांबद्दल लाज वाटत असेल तर तुम्हाला पुढाकार घ्यावा लागेल. तुम्ही बोलण्यापूर्वी बदल घडले तर तुमचे मूल गोंधळून जाऊ शकते किंवा त्याला भीती वाटू शकते.

जर तुम्ही हा संवाद आधीच सुरु केला नसेल, आणि तुमच्या मुलात जर वयात आल्याची

लक्षणे दिसायला लागली असतील तर, त्याबद्दल बोलण्यासाठी मागे पुढे पाहू नका. याबद्दल बोलण्यासाठी कधीही उशीर झालेला नसतो. जर शरीरातील बदलाबद्दल त्यांना तुमच्याकडून माहिती मिळाली नाही तर, अशीही खूपच शक्यता आहे की ते दुसरीकडून माहिती मिळवण्याचा प्रयत्न करतील. त्यांना जी माहिती मिळेल ती कदाचित अयोग्य आणि गोंधळात टाकणारी असेल. अशावेळी इतर लोक त्यांचा गैर फायदा घेऊ शकतात, त्यामुळे त्यांचा असुरक्षितपणा वाढू शकतो. ह्याबद्दल अधिक माहितीसाठी 'वैयक्तिक सुरक्षेबद्दल माहिती' हा विभाग पहा.

प्रश्न xi

## वयात येत असताना मुलांना सर्वांत जास्त चिंता कोणत्या गोष्टींबद्दल वाटते ?

यौवन के दौरान बच्चों की चिंताएं अलग अलग वयात येत असताना मुलांना वाटणाऱ्या चिंताचे विविध प्रकारात वर्गीकरण करता येते : नातेसंबंध, अपेक्षा, शारीरिक बदल, लैंगिकता, शिक्षण आणि भविष्य.

वयात येणाऱ्या मुलांना त्यांचे शरीर सामान्य आहे, हे सांगून खूप वेळा पुन्हा आश्वासित करावे लागते. आपल्या शरीराबद्दल निरोगी भावना निर्माण होण्यासाठी मुलींना आणि मुलांना मदतीची गरज असते. स्तन, लिंग, स्तनाग्रे, लेबिया (भगोष्ठ), वृषण आणि शिश्निका हे वेगवेगळ्या आकाराचे, रंगाचे असतात आणि सर्वसामान्य असतात, हे मुलांना माहिती करून देण्याची गरज आहे. प्रत्येक व्यक्ती दुसऱ्यापेक्षा वेगळी आहे आणि वेगळेपणाच त्यांना अद्वितीय, विशेष आणि खास बनवतो हे समजण्यासाठी त्यांना मदतीची गरज असते. वयात आल्यावर मुलांना मासिक पाळी, लैंगिक विचार आणि भावना, स्वप्नदोष, मैथुनोत्कर्ष, हस्तमैथुन आणि दुय्यम लैंगिक वैशिष्ट्ये ह्यांची माहिती असणे गरजेचे आहे. मुलांना वैयक्तिक मर्यादा, निरोगी आणि धोकादायक नातेसंबंध तसेच आदर आणि जबाबदारी ह्याबद्दल माहिती असणे आवश्यक आहे. स्वत:ला सुरक्षित ठेवणे, असुरक्षित स्थितीत ठाम राहणे उदा., लैंगिक दमदाटी (बुलिंग) तसेच समवयस्कांकडून येणाऱ्या दबावाला कसा प्रतिसाद द्यावा, ह्याबद्दल माहिती असणे आवश्यक आहे.

प्रश्न xii

## मुलींच्या वयात येण्याबद्दल मुलांना माहिती द्यावी का ? मुलांच्या वयात येण्याबद्दल मुलींना माहिती द्यावी का ?

हो. नक्कीच. दोन्ही लिंगांच्या व्यक्तींमध्ये कोणते बदल होत आहेत, हे समजल्यामुळे मुलांची निरोगी जिज्ञासा शांत होते. सर्वांमध्ये वयात येताना बदल होतात, ह्याबद्दल ते आश्वस्त होतात, आणि दुसऱ्या लिंगाबद्दल त्यांच्या मनात आदर आणि समज निर्माण होते. वयात आल्यावर दोन्ही लिंगाच्या व्यक्तींच्यामध्ये होणारे बदल समजले की पुनरुत्पादन कसे होते, हे समजून घेण्यासही मुलांना मदत होते. ही माहिती वयाला योग्य,तटस्थ पद्धतीने दिली की समानुभूती निर्माण होण्यास सुद्धा मदत होते.

प्रश्न xiii

## विरुद्ध लिंगाच्या पालकाने मुलाशी वयात येण्याबद्दल बोलणे योग्य आहे का ?

हो. आपल्या मुलांना असे सांगण्याचा चांगला मार्ग आहे कि, प्रौढांना स्त्री आणि पुरुष दोघांच्या शरीराबद्दल माहिती असणे हि सामान्य गोष्ट आहे. मुले त्यांच्या आयुष्यातील विविध लोकांना विविध प्रश्न विचारू शकतात आणि मुले विविध लोकांबरोबर असताना चर्चेच्या विविध संधी सुद्धा तयार होत असतात- तुमची मुले तुम्हाला एक गोष्ट विचारतील आणि तुमच्या जोडीदाराला ( नवऱ्याला / बायकोला) दुसराच प्रश्न विचारतील. जर तुम्ही एकल पालक( सिंगल पेरेंट) असाल

तर मूल तुमच्याशी बऱ्याच गोष्टींबद्दल बोलेल पण दुसऱ्या विश्वासार्ह प्रौढालासुद्धा वेगळे प्रश्न विचारेल. तुमच्या मुलाला मोठी भावंडे असतील किंवा कुटुंबात इतर सदस्य असतील तर मुले त्यांनासुद्धा प्रश्न विचारतात. शेवटी, विविध दृष्टीकोन समजल्यामुळे आणि लैंगिकता तसेच वैयक्तिक सुरक्षा ह्याबद्दल मोकळेपणाने चर्चा झाल्यामुळे मुलांना फायदाच होतो.

**प्रश्न xiv**

## पालक आणि किशोर अवस्था वयातील मुले ह्यांच्या नात्यातील महत्त्वाचे गुण कोणते?

निरोगी नात्याचे सर्वात महत्त्वाचे गुण आहेत:

a) परस्परांबद्दलचा आदर

b) परस्परांच्या भावना समजून घेणे/ समानुभूती दाखवणे

c) परस्परांवर विश्वास ठेवणे

d) परस्परांच्या स्वास्थ्याची चिंता असणे

परस्परांना समजून घेणे. निरोगी नात्यामध्ये, किशोर अवस्था वयातील मुले आदर दाखवतात, भावना समजून घेतात, विश्वास ठेवतात आणि चिंता करतात. अर्थात, सर्वच नाती दोन्ही बाजूंनी काम करतात. त्यामुळे किशोर अवस्था मधील मुले-पालक ह्यांच्या निरोगी नात्यात पालक सुद्धा मुलांबद्दल आदर दाखवतात, त्यांच्या भावना विचारात घेतात, त्यांच्या स्वास्थ्याची चिंता करतात आणि त्यांच्या आयुष्यात रस घेतात.

**प्रश्न xv**

## किशोर वयातील मुलाबरोबर माझे निरोगी नाते संबंध असण्याचा त्याच्या आरोग्यावर आणि विकासावर कसा परीणाम होईल?

किशोर वयातील मुले आणि पालक यांचे निरोगी नातेसंबंध असणे ह्या मुलांना सुरक्षित आणि निरोगी ठेवण्यासाठी महत्त्वाचे असण्यामागे विविध कारणे आहेत. मुलांबरोबर असलेले घट्ट नातेसंबंध त्यांचे शोषण होण्याची शक्यता कमी करतात आणि त्यांना गरज असेल तेव्हा मदत उपलब्ध करून देतात. आपले पालक आपल्याला आधार देतात आणि आपल्यासाठी उपलब्ध असतात हे कळल्यामुळे खुले आणि मोकळे नाते मुलांना ताकदवान बनवते. जेव्हा मुलांचे पालकांबरोबर आणि इतर काळजी वाहकांबरोबर निरोगी नाते संबंध असतात तेव्हा मुले पालकांचे पर्यवेक्षण मान्य करण्याची, मूल्ये आणि आदर्श स्वीकारण्याची आणि सुरक्षितपणे वागण्याची शक्यता सुद्धा वाढते.

**प्रश्न xvi**

## पालक म्हणून मी किशोर वयातल्या मुलांशी निरोगी नाते कसे प्रस्थापित करावे ?

पालक आणि त्यांची किशोर वयातील मुले ह्यांच्यातील संबंध सुधारण्याचे अनेक मार्ग आहेत.
<u>संपर्क ठेवणे.</u> ह्या वयातील मुलांशी आपण नियमित संपर्क ठेवला पाहिजे, जरी सगळे सुरळीत घडत असले तरीसुद्धा. आपल्या आयुष्यात काय घडत आहे हे आपण त्यांना सांगायला हवे आणि त्यांचे काय चाललेय हे पाहायला हवे.

<u>एकत्र वेळ घालवणे.</u> हल्ली कुटुंबे खूपच व्यस्त असतात. नोकरी, कामे आणि इतर गोष्टींमधून एकमेकांच्या सहवासाचा आनंद लुटायला बऱ्याचदा खूप कमी वेळ उरतो. जो काही वेळ शक्य आहे तो आपण किशोर ह्या वयातील आपल्या मुलांबरोबर घालवायला हवा. आपल्या मुलांच्या रिकाम्या वेळातला काही वेळ आपण व्यापू शकतो, आणि त्यामुळे ह्या मुलांना अधिक चांगल्या पद्धतीने समजून घेण्यास आपल्याला

त्याचा उपयोग होईल. त्यामुळे आपले निरोगी नातेसंबंध तयार होतील आणि आपण मुलांची काळजी करतो, हे त्यांना समजेल.

वचने पाळणे. जर आपण त्यांना काही वचने दिली तर ती पाळली पाहिजेत( जी वचने पाळणे व्यवहार्य आणि शक्य आहे, अशीच वचने द्या.) जेव्हा आपण आपल्या नियंत्रणाबाहेरच्या गोष्टीमुळे आपली वचने पळू शकत नाही, तेव्हा त्याबद्दल मुलांशी बोलले पाहिजे. आपल्याला माफ करण्यास आपण त्यांना सांगितले पाहिजे. आपण दिलेला शब्द पाळतो, ह्यावर आपल्या मुलांचा विश्वास असायला हवा. विश्वास आणि आदर मिळवण्याचा हा मोठा भाग आहे. जर आपण आपला शब्द पाळला, तर ते त्यांचा शब्द पळतील, अशी मोठी शक्यता आहे.

किशोर अवस्था वयातील आपल्या मुलांना त्याच वयातील मुलांप्रमाणे वागवा. जरी आपली ह्या वयातील मुले प्रौढ झालेली नसली तरी आता ती लहान मुले देखील राहिलेली नाहीत आणि त्यांना लहान मुलांप्रमाणे वागवले जाऊ नये. आपण त्यांच्याशी प्रामाणिक असले पाहिजे. " हे कळायला तू अजून खूप लहान आहेस." अशी विधाने ह्या वयातील मुलांच्या समजण्याच्या शक्तीचा अनादर करतात. विशेष प्रयत्नांचे कौतुक करा. **किशोर अवस्था** वयातील आपल्या मुलांना आपण गृहीत धरता कामा नये. परीक्षेत चांगली कामगिरी, खेळासाठी किंवा कार्यक्रमासाठी चांगला सराव किंवा कोणाशीतरी विशेष दयाळूपणे वागणे, अशा त्यांच्या विशेष प्रयत्नांचे आपण कौतुक केले पाहिजे. आपली मुले जशी आहेत तसे आपण त्यांना स्वीकारले पाहिजे." तू तुझ्या मोठ्या भावासारखा का नाहीस? " किंवा "तुझ्या बहिणीने तुझ्यासारखा त्रास कधी दिला नाही" अशी विधाने मुलांना चांगले वागण्यास उपयुक्त ठरत नाहीत. ह्या शेऱ्यांमुळे मुलांना फक्त वाईट वाटते. प्रत्येक मुलामध्ये खास गुण असतात. आपण हे गुण ओळखले पाहिजेत आणि मुलांना त्यांची माहिती करून दिली पाहिजे.

आपण काळजी करतो, हे त्यांना कळू द्या. आपले आपल्या मुलांवर प्रेम असते, पण हे त्यांना सांगण्यासाठी आपण कितीदा वेळ काढतो? आपण आपल्या मुलांची किती काळजी करतो, हे त्यांना रोज सांगायला हवे. ही एक सवयच आपण लावून घ्यायला हवी!

त्यांना आधार द्या. जेव्हा किशोर अवस्था वयातील आपल्या मुलांच्या आयुष्यात एखादा वाईट दिवस येतो , तेव्हा आपण आपला खांदा त्यांना आधारासाठी द्यायला हवा. जरी आपल्या मुलांना मोठे व्हायचे असले तरी, अजून त्यांना आपल्या आधाराची गरज असते. आपण त्यांचे म्हणणे समानुभूतीपूर्वक ऐकून घेतले पाहिजे.

दुखावणारी चेष्टा टाळा. कधीकधी आपण अशा प्रकारे चेष्टा करतो की त्यामुळे व्यक्ती दुखावली जाते, हे आदरयुक्त वागणे नाही. आपल्या मुलांची अशा प्रकारे चेष्टा करणे - विशेषत: इतरांसमोर - आपण टाळले पाहिजे. त्याने मुले दुखावली जातात.

विनोदाचा वापर करा आणि वातावरण उजळून टाका. आपण आपल्या किशोर अवस्था वयाच्या मुलांबरोबर विनोद करु शकतो आणि कधीकधी स्वत:ची चेष्टा करण्याची तयारी सुद्धा दाखवू शकतो. विनोद केल्यामुळे सकारात्मक नातेसंबंधांना प्रोत्साहन मिळते.

मर्यादा आखण्यात आणि नियम बनवण्यात मुलांना सामील करून घ्या. पालक म्हणून आपण आपल्या मुलांना मर्यादा आखण्यासाठी आणि नियमाप्रमाणे जगण्यासाठी मदत केली पाहिजे. पण ह्या मर्यादा कोणत्या असाव्यात आणि हे नियम कोणते असावेत हे ठरवण्यात आपण त्यांना सक्रीय भूमिका दिली पाहिजे. आपल्या मुलांशी खरेपणाने वागा. मुलांशी मोकळेपणाने आणि वारंवार संवाद साधून, त्यांच्या स्वास्थ्याविषयी चिंता असलेल्या व्यक्ती म्हणून ते आपल्याला ओळखू लागतील.

# CSA आणि संबंधित विषयावर काम करणाऱ्या संस्थांची सूची.

| | | |
|---|---|---|
| संपूर्ण भारतभर | चाईल्डलाईन | दूरध्वनी: 022-2495 2610, 2495 2611, 2482 1098/ 2490 1098/ 2491 1098<br>हेल्पलाईन क्रमांक: 1098<br>इ-मेल: dial1098@childlineindia.org.in<br>वेबसाईट : www.childlineindia.org.in<br>चाईल्डलाईन इंडीया फाऊंडेशन भारतभर **34** राज्यातील/ केंद्रशासित प्रदेशातील **366** शहरे/ जिल्ह्यात त्यांच्या 700 भागीदार संस्थांच्या जाळ्यामार्फत कार्यरत आहे. |
| बेंगलोर | असोसिएशन ऑफ प्रमोशन ऑफ सोशल ॲक्शन (एपीएसए) | 34, अण्णा सांड्रापल्या, विमानपुरा, बेंगलोर, कर्नाटक-560017<br>दूरध्वनी: (+91)80-252322749<br>इ-मेल : projects@apsabangalore.org<br>वेबसाईट: http://www.apsabangalore.org |
| | एनफोल्ड | एनफोल्ड प्रोॲक्टीव्ह हेल्थ ट्रस्ट<br>553 बी, पहिला मजला,<br>8वा मेन रोड, चौथा ब्लॉक<br>कोरमंगला, बेंगलोर 560 034<br>दूरध्वनी: +91-99000-94251, +91-80-25520489<br>इ-मेल : info@enfoldindia.org<br>वेबसाईट: www.enfoldindia.org |
| चेन्नई | तुलीर | नवा क्रमांक 74, जुना क्रमांक 57,<br>इ.व्ही.के. संपत मार्ग,<br>वेपेरी, चेन्नई 600 007<br>जवळची खूण: दिना तंठी कार्यालयाजवळ<br>दूरध्वनी: 91+44+43235867<br>इ-मेल : tulircphcsa@yahoo.co.in<br>वेबसाईट: www.tulircphcsa.org |
| दिल्ली | राही | बी- 200 चित्तरंजन पार्क, दुसरा मजला,<br>नवी दिल्ली - 110091<br>दूरध्वनी: 011 41607055<br>इ-मेल : info@rahifoundation.org<br>वेबसाईट: www.rahifoundation.org |

| | | |
|---|---|---|
| गोवा | चिल्ड्रेन्स राईट्स इन गोवा (सी. आर.जी.) | चिल्ड्रेन्स राईट्स इन गोवा<br>फ्लॅट क्र.11, घर क्र.754/1<br>दुसरा मजला, क्रिस्टीना अपार्टमेंटस,<br>पोर्वोरीम, बार्देझ,<br>गोवा – 403 521<br>दूरध्वनी: 00 91 832 2426518<br>इ-मेल : crg.goa@gmail.com<br>वेबसाईट: www.childrightsgoa.org |
| गुरगाव | स्कूल ऑफ लाईफ | पी-81, साउथ सिटी 1, गुरगाव,<br>हरियाणा<br>दूरध्वनी: 0124-4286360, 0124-4286362<br>इ-मेल : contactus@schooloflife.org.in<br>वेबसाईट: www.schooloflife.org.in |
| जोधपूर | मानव कल्याण संस्थान - ह्युमन वेल्फेअर सोसायटी | 50, लक्ष्मीनगर<br>जोधपूर 342010, भारत<br>दूरध्वनी: 00 91 291 255 0390<br>इ-मेल : manavkalyan@hotmail.com |
| मुंबई | आरंभ | आरंभ इंडीया<br>401, चौथा मजला,<br>एसी मार्केट, ताडदेव,<br>मुंबई 400 034.<br>दूरध्वनी: +91 9892210066<br>इ-मेल : info@aarambhindia.org<br>वेबसाईट: www.aarambhindia.org |
| | अंगण | अंगण ट्रस्ट<br>1/48 ताडदेव ए/सी मार्केट<br>ताडदेव ,<br>मुंबई 400 034<br>दूरध्वनी: +91 (0)22 23 525 832<br>इ-मेल: contact@aanganindia.org<br>वेबसाईट: www.aanganindia.org |
| | अर्पण | पहिला मजला, डेल्टा केमिकल्स प्रा.लि, जे/1, कामा इंडस्ट्रीयल झोन, ऑफ वलभट्ट मार्ग, गोरेगाव पूर्व, मुंबई 400063, भारत.<br>दूरध्वनी: 022 2686 2444 / 2686 8444<br>इ-मेल: info@arpan.org.in<br>वेबसाईट: www.arpan.org.in |

| | | |
|---|---|---|
| | बालप्रफुल्लता,<br>ए चाईल्ड राईट्स ऑर्गनायझेशन | प्लॉट क्र.. 5/1, 11/B/11, विशाखा सोसायटी, नागरी निवारा कॉम्प्लेक्स, गोरेगाव पूर्व, मुंबई 400065.<br>दूरध्वनी: 9619730382<br>इ-मेल : write2vidhayakbharti@gmail.com |
| | सेहत | हेड ऑफीस<br>**सेहत**<br>सर्व्हे क्र.2804 & 2805<br>आराम सोसायटी रोड, वाकोला<br>सांताक्रूझ पूर्व<br>मुंबई - 400 055<br>दूरध्वनी: 91-22-26673571/ 26673154<br>इ-मेल: cehat@vsnl.com<br><br>शाखा कार्यालये<br>**पेहेल**<br>203, चर्च व्ह्यू अपार्टमेंटस<br>सेंट ॲन्थनी मार्ग,<br>वाकोला, सांताक्रूझ पूर्व<br>मुंबई - 400 055<br>टेलीफॅक्स: 91-22-26661690<br>इ-मेल: pehel@vsnl.net<br><br>दिलासा<br>डीपार्टमेंट क्र. 101<br>के.बी.भाभा म्युनिसिपल हॉस्पिटल<br>आर.के. पाटकर मार्ग, बांद्रा पश्चिम<br>मुंबई - 400 050<br>दूरध्वनी: 022- 26400229 (थेट)<br>022- 26422775/266422541 विस्तारीत क्र. 4376,4511<br>इ-मेल : dilaasa@vsnl.com |
| | एफएसीएसइ – फोरम अगेन्स्ट चाईल्ड सेक्शुअल एक्स्प्लॉयटेशन | मुंबई दूरध्वनी : 9869989841<br>इ-मेल : facse95@gmail.com |
| | जीवन आधार ट्रान्सफॉर्मेटीव्ह आफ्टर केअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड | रुस्तुमजी रेगल सीएचएस लिमिटेड, शॉप नंबर एस-01 आणि एस -02, तळमजला, रुस्तुमजी एकर्स, जे.एस. मार्ग, दहिसर पश्चिम मुंबई 400068.<br>दूरध्वनी:<br>इ-मेल : vf@vsnl.com |

| | | |
|---|---|---|
| | मजलिस | मजलिस लिगल सेंटर<br>ए 2/4 गोल्डन व्हॅली,कलिना,मुंबई 400098 भारत<br>दूरध्वनी: 91-22-26662394 / 26661252<br>इ-मेल : majlislaw@gmail.com |
| | रुबरू | 218, प्रेम बाग, पहिला मजला,रुईया महाविद्यालयाच्या मागची गल्ली, कॉलनी नर्सिंग होम जवळ, सर भालचंद्र मार्ग,<br>माटुंगा (मध्य रेल्वे), मुंबई - 400019.<br>दूरध्वनी: 9619061805, 098209 31171<br>इ-मेल : rubarooindia@gmail.com<br>वेबसाईट: http://www.rubarooindia.com/wp/ |
| | द फाऊंडेशन | नोंदणीकृत कार्यालय :<br>बी-402, न्यू सागर दर्शन,<br>डॉ. इ हातीस्कर मार्ग,<br>प्रभादेवी,<br>मुंबई - 400 025<br><br>कार्यालयाचा पत्ता:<br>21-डी, तिसरा मजला,<br>फिल्म सेंटर बिल्डींग,<br>68, ताडदेव मार्ग, ताडदेव,<br>मुंबई 400034<br>दूरध्वनी: 91 22 23521641<br>इ-मेल: suchismita.thefoundation@gmail.com<br>वेबसाईट: www.thefoundation.in/project-h.e.a.l.html |
| पुणे | मुस्कान – मुलांच्या लैंगिक शोषणाच्या विरुद्धचा पुढाकार | पुणे<br>दूरध्वनी: 9822377348<br>मुस्कान हेल्पलाईन: +91-9689062202<br>इ-मेल : muskaanpune@gmail.com |

# संदर्भ ग्रंथांची सूची


शिकागो चिल्ड्रेन्स ॲडव्होकासी सेंटर, अँड टेनेसी डीपार्टमेंट ऑफ चिल्ड्रेन्स सर्व्हिसेस, डी.डी.स्टॉप इट नाऊ! स्टॉप इट नाऊ! मधून घेतलेले: http://www.stopitnow.org/faq/faqs-on-prevention-for-children-with-disabilities

किड्स इन द नो. कॅनेडियन सेंटर फॉर चाईल्ड प्रोटेक्शन : https://www.kidsintheknow.ca/app/en/parents-faq

प्लॅन्ड पेरेंटहूड. प्लॅन्ड पेरेंटहूड फेडरेशन ऑफ अमेरीका इंक, मधून घेतलेले . 1-800-230-PLAN: https://www.plannedparenthood.org/parents/puberty-101-for-parents

प्लॅन्ड पेरेंटहूड. प्लॅन्ड पेरेंटहूड फेडरेशन ऑफ अमेरीका इंक, मधून घेतलेले: https://www.plannedparenthood.org/parents/parent-teen-relationships

स्टॉप इट नाऊ! युके आणि आयर्लंड. चाईल्डस प्ले? प्रीव्हेटिंग अब्युज अमंग चिल्ड्रेन अँड यंग पिपल . स्टॉप इट नाऊ!

स्टॉप इट नाऊ! युके आणि आयर्लंड. द इंटरनेट अँड चिल्ड्रेन - व्हॉट्स द प्रॉब्लेम? स्टॉप इट नाऊ!

ह्या स्रोताची अधिक माहिती तुम्ही इंटरनेटवर पाहू शकता :

http://www.stopitnow.org/sites/default/files/documents/files/tip_sheet_behaviors_to_watch_for.pdf

http://www.stopitnow.org/sites/default/files/documents/files/lets_talk.pdf

# संसाधने

अर्पणचे खालील वैयक्तिक सुरक्षा शिक्षणाशी संबंधित अभ्यासक्रम www.arpanlearn.com वर विनामूल्य उपलब्ध आहेत. प्रौढ (मोठ्या) व्यक्ती तसेच मुले त्यांच्या सुरक्षेविषयीची सर्व माहिती येथे प्राप्त करू शकतात.

१. बालकांसाठी ऑनलाइन संसाधने

अ. माझे सुरक्षा पुस्तक ( ४ वर्षांवरील मुलांसाठी)

ब. वैयक्तिक सुरक्षा अभ्यासक्रम ( ८ ते १० वयोगटातील मुलांसाठी)

(हा अभ्यासक्रम केवळ इंग्रजी आणि हिंदीमध्ये उपलब्ध आहे.)

अर्पणची अन्य संसाधने www.arpan.org.in  वर उपलब्ध आहेत.

१. प्रौढांसाठी (मोठ्यांसाठी) ऑनलाइन संसाधने

अ. बाल लैंगिक शोषण: प्रतिबंध आणि प्रतिक्रिया काळजीवाहकांसाठी हस्तपुस्तिका

ब. बाल लैंगिक शोषण समजून घेताना: वारंवार विचारले जाणारे प्रश्न

२. व्यावसायिक आणि शोधकर्त्यांसाठी ऑनलाइन संसाधने

अ. मुक्तता आणि उपाय

**ब. Between the Lines - An analysis of media reportage on Child Sexual Abuse ( हे केवळ इंग्रजीमध्ये उपलब्ध आहे)**

क. Recounting Abuse, Reporting Abusers - Reflecting from Survivors on Mandatory reporting

( हे केवळ इंग्रजीमध्ये उपलब्ध आहे)

३. प्रशिक्षकांसाठी संसाधन

अ. वैयक्तिक सुरक्षा शिक्षण प्रशिक्षण कीट

अधिक माहितीसाठी आमच्याशी संपर्क साधा : communications@arpan.org.in

आमचे आधारस्तंभ:

ate CHANDRA FOUNDATION

Azim Premji Philanthropic Initiatives

Deloitte.

Goldman Sachs

ICICI PRUDENTIAL LIFE INSURANCE

KARL-JOHAN PERSSON

MANANTRUST

Our Mission... Your Growth CAMS

PEGASUS

R. Jhunjhunwala Foundation

Reliance Foundation

ROHINI NILEKANI philanthropies

SBI FOUNDATION Service Beyond Banking

SHARE & CARE FOUNDATION

TATA TRUSTS

THE GLOBAL FUND FOR Children

m THE MARSHALL FOUNDATION

unicef for every child

अर्पण
बाल लैंगिक शोषणापासून मुक्तिकडे

अर्पण, ही मुंबई मध्ये स्थितसंस्था आहे जिचं उद्देश्य बाल लैंगिक शोषणचं प्रतिबंध आणि ज्यांवर बाल लैंगिक शोषणचं प्रभाव झालं आहे त्यांच्यावर उपचार करणे आहे. ही पुस्तिका अर्पणच्या जागृती व प्रशिक्षण सत्रांमध्ये पालक, शिक्षक आणि अन्य काळजी घेणार्यांकडून उदभवलेल्या व वारंवार विचारले जाणार्या प्रश्नांचा संच तयार करण्याचा प्रयत्न आहे.

आशा आहे कि ही पुस्तिका काळजी घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला बाल लैंगिक शोषण समजून घेण्यास माहिती तसेच शब्दसंग्रह लाभेल आणि त्याचबरोबर कायदेशीर हस्तक्षेप, प्रगटीकरण, वैयक्तिक सुरक्षा शिक्षण संबंधी माहिती, प्रभाव व उपचार या संबंधी देखील संक्षिप्त माहिती प्राप्त होईल.


**अर्पण ऑफिस**
अर्पण हाऊस, डेल्टा केमिकल्स प्रा. लि.,
जे-१, कामा इंडस्ट्रियल इस्टेट,
ऑफ वाल भट्ट मार्ग, गोरेगाव (पू),
मुंबई 400063, भारत

**माहिती साठी**
T 26862444 | 26868444
M +91.98190.51444
E info@arpan.org.in
www.arpan.org.in
www.arpanelearn.com

**समुपदेशनासाठी**
M +91.98190.86444
E support@arpan.org.in


www.sixofusdesign.com